अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२१ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १४४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## मागील भांडणावरुन खून; तिघांना अटक



**सोलापूर** : मागील भांडणाचा राग मनात धरून विजापूर रोडवरील चांद तारा मस्जिद जवळ एकाचा डोक्यात बांबू घालून खून करण्यात आला.याप्रकरणी तिघा संशयित आरोपींना अटक केली. सोमवारी त्यांना न्यायालयात हजर केले असता सत्र न्यायाधीश एन.एम.बिरादार यांनी त्यांना २३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घटनेची हकिकत अशी की,फिर्यादी नासीरखान मौलाली पठाण (वय-३६,रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं.२,मारुती मंदिराजवळ,विजापूर रोड,सोलापूर) याचा भाऊ आमिरखान मौलाली पठाण (वय-३५) यास १६ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास चांद तारा मस्जिद जवळ संशयित आरोपी सागर चंदनशिवे, जाकीर सय्यद व रवी आठवले (तिघे.रा.संजय नगर झोपडपट्टी, विजापूर रोड, सोलापूर) यांनी मागील भांडणाचा राग मनात धरून आमीरखानच्या डोक्यात पाठीमागून येऊन बांबूने जबर प्रहार केला. यात उपचारादरम्यान आमिरखान हा मरण पावला. याबाबत फिर्यादीने १९ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकरा वाजता विजापूर नाका पोलीस ठाण्यात संशयित आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला.विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय जगताप व त्यांच्या पथकाने संशयित आरोपी सागर चंदनशिवे, रवी आठवले व जाकीर शेख या तिघांना अटक केली. न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. हा खून या तिघांनी नेमका कोणत्या कारणासाठी केला आहे?याची माहिती तपासातून पुढे येईल, असे पोलीस निरीक्षक जगताप यांनी सांगितले.

# त्यांनी मला विमानातून खाली उतरवलं, नियतीनं त्यांना खुर्चीवरून खाली खेचलं

## राज्यपालपदावरून उतरताच कोश्यारींनी तोंड उघडलं

**सुराज्य/मुंबई**

उद्धव ठाकरे हे संत माणूस आहेत. ते कुठे राजकारणात आले? त्यांनी त्यांची संघटना व्यवस्थितपणे चालवायला हवी होती. उद्धव ठाकरे मुख्यमंत्रिपदी बसण्याच्या लायकीची व्यक्ती नव्हती. तरीही त्यांना मुख्यमंत्री करण्यात आलं. शरद पवारांसारखा मार्गदर्शकही उद्धव ठाकरेंना वाचवू शकला नाही. मी महाराष्ट्रात राज्यपाल असताना त्यांनी मला विमानातून उतरवलं होतं. आता नियतीनं त्यांना मुख्यमंत्रिपदावरून, त्या खुर्चीवरून खाली उतरवलं आहे. मी त्यांना सत्तेतून खाली खेचलं नाही, पण नियतीनं जे करायचं ते केलं , अशी खोचक टीका माजी राज्यपाल कोश्यारींनी केली.

सोमवारी कोश्यारी यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. त्यावेळी त्यांनी अनेक मुद्यांवर भाष्य केले. फेब्रुवारी २०२१ मध्ये भगतसिंह कोश्यारी महाराष्ट्राचे राज्यपाल असताना त्यांना मसुरी येथे आयएएस ॲकॅडमीत होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जायचे होते. प्रोटोकॉलनुसार त्यांना सरकारी विमानाने जायचे होते. मात्र राज्य सरकारकडून संमती न मिळाल्याने भगतसिंह कोश्यारी यांना विमानातून उतरावे लागले होते. या घटनेचा संदर्भ पकडून 'त्यांनी मला विमानातून खाली उतरवलं, आज नियतीनं त्यांना मुख्यमंत्रिपदावरून, खुर्चीवरून खाली खेचलं', अशी उपरोधिक टीका कोश्यारी यांनी केली.

कोश्यारी यांनी त्यांच्या कार्यकाळात महाविकास आघाडी सरकारने पाठवलेली राज्यपाल नियुक्त बारा आमदारांची यादी मंजूर केली नव्हती. यासंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नावर बोलताना कोश्यारी म्हणाले, विधानपरिषदेच्या १२ आमदारांच्या नियुक्तीबाबत महाविकास आघाडीची शिष्टमंडळं माझ्याकडे यायची. मी त्यांना एकदा सांगितले की, हे पहिले पाच पानी पत्र बघा. पाच पानी पत्रात तुम्ही राज्यपालांना धमकी देत आहात. हा कायदा, तो कायदा म्हणत धमकावत आहात. पत्रात शेवटी लिहिलं होतं की, पुढील १५ दिवसांत मंजूर करा. कुठं लिहिलं आहे की, मुख्यमंत्री राज्यपालांना सांगू शकतात की हे एवढ्या दिवसांत मंजूर करा म्हणून? हे कुठं लिहिलंय संविधानात? ते पत्र पाठवलं नसतं, तर त्याच्या दुसऱ्या दिवशी मी १२ आमदारांच्या नियुक्तीच्या शिफारशींवर सही करणार होतो, असे कोश्यारी यांनी सांगितले.



### ते अडकले शकुनीमामांच्या चक्रव्यूहात

उद्धव ठाकरे यांच्याशी माझे संबंध चांगलेच होते. पण त्यांचे सल्लागार कोण होते? शिवसेनेचे आमदार माझ्याकडे येऊन आम्हाला वाचवा. उद्धव ठाकरे हे शकुनीमामांच्या चक्रव्यूहमध्ये अडकले आहेत, असे सांगायचे. माहिती नाही की, त्यांना कोणते शकुनीमामा मिळाले होते? उद्धव ठाकरे तर सज्जन माणूस आहेत, बिचारे राजकारणाच्या चक्रव्यूहात अडकले आहेत, असे मतही उध्दव ठाकरेंविषयी कोश्यारींनी व्यक्त केले.

### पहाटेच्या शपथविधीवर काय म्हणाले कोश्यारी?

पहाटेचा शपथविधी म्हणणं चुकीचं आहे. कारण तो सकाळचा शपथविधी होता. जर अजित पवार माझ्याकडे आमदारांच्या सह्या असलेलं पत्र घेऊन येतात आणि हे सांगतात की आम्हाला सरकारमध्ये सहभागी व्हायचं आहे तर मग मी काय करायला हवं होतं? देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा देणार हे देखील सांगितलं. सकाळीच शपथविधी करायचा हे अजित पवारांनी सांगितलं. मी हो म्हटलं. त्यात काय चुकीचं आहे? असा प्रश्न भगतसिंह कोश्यारी यांनी यावेळी उपस्थित केला.

### उध्दव समोर येत नव्हते

महाविकास आघाडीच्या सत्तास्थापनेचा प्रस्ताव आदित्य घेऊन आला होता. तो सारखा फोन करायचा. मी त्याला विचारलं अरे तुमचा नवरदेव कुठे आहे? त्याला आधी आणा. उद्या त्याने मुख्यमंत्री होण्यास नकार दिला तर? तरीही उद्धव ठाकरे पुढे आले नाहीत. मी त्यावेळी प्रफुल्ल पटेल यांना सांगितले की हे चुकीचे आहे. पटलेही बोलले हे चुकीचेच आहे. विचारा छगन भुजबळ व अन्य नेत्यांना हे सत्य आहे की नाही? तीन तासांनी उद्धव ठाकरे समोर आले. यावर कोणीच काही बोलत नाही? असाही प्रश्न कोश्यारी यांनी यावेळी विचारला.

# जमिनीच्या वादातून पुतणीला फेकले सीना नदीत



**सुराज्य/मोहोळ**

आईच्या नावावरील ६ एकर जमीन माझ्या नावावर करून न देण्यासाठी तुम्ही दोघेच जबाबदार आहात, आता तुमचा वंशच शिल्लक ठेवत नाही, असे भाऊ आणि भावजय यांना धमकावून सख्ख्या भावानेच भावाच्या चार वर्षाच्या मुलीचा खून करून मृतदेह सीना नदी पात्रात टाकून दिल्याची घटना सोमवारी सकाळी आठ च्या सुमारास मलिकपेठ येथील सीनानदी पात्रात घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार यशोधन शिवाजी धावणे (रा. डिकसळ ता. मोहोळ) यांच्या कुटुंबास एकूण १६ एकर जमीन आहे. त्यापैकी यशोधन धावणे याचे नावावर ५ एकर, त्यांचा भाऊ यशोदीप धावणे यांच्या नावावर ५ एकर तर बाकीची ६ एकर जमीन त्यांच्या आईच्या नावावर आहे. आईच्या नावावर असलेली ६ एकर जमीन माझ्या नावावर करा म्हणून यशोदीप वारंवार भांडण काढत होता. त्यास गावातील प्रतिष्ठित लोकांनी बऱ्याचवेळा समजावले होते. आईवडील असेपर्यंत त्यांच्या नावावर राहू द्या, नंतर ती तुम्हा दोघा भावांच्या नावावरच होणार आहे, असे वेळोवेळी समजावत होते.

सोमवारी सकाळी सातच्या सुमारास यशोदीप हा त्याचा भाऊ यशोधन बरोबर शेताच्याच कारणावरून तक्रार करू लागला. 'आईच्या नावावरील सहा एकर जमीन माझ्या नावावर करू न देण्यासाठी तुम्ही दोघे नवरा-बायको जबाबदार आहात', असे म्हणत मोठमोठ्याने शिवीगाळ करीत गोंधळ घालू लागला. भाऊ यशोधन व त्याची पत्नीस आज तुमचा फैसलाच करतो, तुमचा वंशच ठेवत नाही, म्हणून शिवीगाळ करीत होता. त्यास काही लोकांनी समजावून सांगून शांत केले. यशोधन त्याची पत्नी व आई असे शेतातील कामे करण्यासाठी सकाळी साडेसातच्या सुमारास निघून गेले. घरात वडील व मुलगी ज्ञानदा झोपले होते. थोड्या वेळाने यशोधन घरी आला तेव्हा त्यास त्याची मुलगी दिसली नाही. त्यावेळी त्याचा भाऊ यशोदीप याने ज्ञानदाला मलिकपेठ येथे सीना नदीत टाकून दिले असल्याचे सांगितले. तेव्हा घाबरून यशोधन व इतर सर्व जण मलिकपेठ येथे नदीवर आले असता पुलाच्या पूर्वेस मुलगी ज्ञानदा ही तरंगत असताना दिसली. जमलेल्या लोकांनी तिला पाण्यातून बाहेर काढले आणि तातडीने मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासून ती मृत झाल्याचे सांगितले. याबाबत मुलीच्या पित्याने फिर्याद दिली असून मुलीचा चुलता यशोदीप धावणे याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# आयोगापुढे पेच

केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेना व धनुष्यबाण बहाल करून टाकले असले तरी शिवसेना नेमकी कोणाची? ठाकरेंची की शिंदेंची? या वादावर बराच काळ काथ्याकूट होण्याची चिन्हे दिसत आहेत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. उद्धव ठाकरे यांनी तिथे दाद मागितली आहे. कोर्टाचा निर्णय होईपर्यंत हे प्रकरण लटकत राहणार असे दिसते. हा निर्णय होईपर्यंत आयोगाच्या निकालानुसार शिंदे गट शिवसेना आणि धनुष्यबाणाचा पुरेपूर उपयोग येणाऱ्या निवडणुकीत करत राहील, यात शंकाच नाही. देशातील विचारवंत मात्र आयोगाला पिंजऱ्यात उभे करत आहेत. आयोगाने निर्णय देण्याची घाई केली तसेच काही मुद्यांचा विचार करायला हवा होता, असे मत त्यांच्याकडून व्यक्त होत आहे.अर्धशतकापूर्वीच्या एका प्रकरणाची तोडफोड करून हा निर्णय दिला गेला असून राज्यातील पक्षांतर व पक्ष-फूट याविषयी 'दहाव्या अनुसूची'तील तरतुदींचा अर्थ सर्वोच्च न्यायालयात लावला जात असताना आयोगाने निकाल देण्याची घाईदेखील केली, असा आरोप आयोगावर लावला गेला आहे. शिवसेना कोणाची? या प्रलंबित प्रश्नाचे आयोगाने दिलेले उत्तर अपेक्षित असले तरी प्रत्यक्षात आल्यावर ते धक्कादायकच ठरले आहे. निवडणूक आयोगाने या प्रश्नाचे उत्तर देताना सादिक अली विरुद्ध निवडणूक आयोग या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेतल्याचे सांगितले जाते. वरवर पाहता हे खरे वाटते. परंतु या प्रकरणाकडे बारकाईने पाहिल्यास या निर्णयाचा सोयीस्कर वापर केल्याचे दिसून येते,असे विचारवंत सांगतात.१९६९ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विभाजन झाले होते. राष्ट्रपतीपदाचा उमेदवार निश्चित करताना इंदिरा गांधी आणि सिंडिकेट काँग्रेस यांच्यात मतभेद निर्माण झाले. इंदिरा गांधी यांनी व्ही. व्ही. गिरी या अपक्ष उमेदवाराला पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध पाठिंबा देऊन निवडूनही आणले. काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीद्वारे इंदिरा गांधी आणि त्यांचे सहकारी यांना पक्षातून काढून टाकले. परंतु इंदिरा गांधी यांनी आपलाच पक्ष मूळ असल्याचा दावा केला. निवडणूक आयोगाने अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सदस्य, मतदानाचा हक्क असलेले प्रतिनिधी आणि आमदार आणि खासदार यांचे बहुमत इंदिरा गांधी यांच्या बाजूने असल्याचे पडताळून घेतले आणि त्या आधारे इंदिरा गांधी यांच्याकडील गट हाच मूळ पक्ष असल्याचा निर्णय दिला. सिंडिकेट काँग्रेस जिला त्यावेळी काँग्रेस (ओ) म्हटले जात होते, तिने निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध न्यायालयात अपील दाखल केले. न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे सखोल विश्लेषण करून तो निर्णय मान्य केला. हेच ते सादिक अली प्रकरण होय. सादिक अली हे १९७१ ते ७३ या कालावधीत काँग्रेस (ओ) चे अध्यक्ष होते. शिवसेना फुटीच्या प्रकरणात निवडणूक आयोगाने याच निर्णयाचा आधार घेतल्याचे सांगितले जाते. वरवर पाहता हे खरे वाटते. परंतु या प्रकरणाकडे बारकाईने पाहिल्यास या निर्णयाचा सोयीस्कर वापर केल्याचे दिसून येते. सादिक अली प्रकरणात न्यायालयाने पक्षाच्या प्राथमिक सदस्यांचे बहुमत हेच मूळ पक्ष ठरविण्याचा आधार मानलेला आहे. कारण पक्ष प्रामुख्याने प्राथमिक सदस्यांनीच बनलेला असतो. तथापि प्राथमिक सदस्यांचे बहुमत कोणाच्या बाजूला आहे, हे निश्चित करणे व्यवहार्य नसल्याने पदाधिकाऱ्यांचे बहुमत हाच मूळ पक्ष ठरविण्याचा निकष म्हणून स्वीकारलेला आहे आणि हे पदाधिकारी म्हणजे केवळ आमदार-खासदार यांच्यापुरते मर्यादित असणे न्यायालयाला सादिक अली प्रकरणात अभिप्रेत नव्हते. त्यासाठी त्यांनी आमदार-खासदार यांच्या बरोबरच अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सदस्य आणि प्रदेश काँग्रेस समिती आणि अशा प्रादेशिक कमिटींने निवडलेले प्रतिनिधी यांचे बहुमत कोणाकडे आहे, हे बघितलेले आहे आणि हे बहुमत अविभाजित काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे होते, हे लक्षात घेतले पाहिजे, असेही विचारवंत सांगतात. सध्याच्या शिवसेनाफुटीच्या प्रकरणातही निवडणूक आयोग सुरुवातीला याच मार्गाने जाऊ इच्छित असल्याचे दिसते. खरे तर विधिमंडळ पक्ष म्हणजे मूळ राजकीय पक्ष ठरू शकत नाही. भारतीय घटनेच्या दहाव्या अनुसूचीनुसार विधिमंडळ पक्षापेक्षा मूळ राजकीय पक्ष भिन्न असून तो विधिमंडळ पक्षापेक्षा अधिक प्रभावी ठरविलेला आहे. मूळ राजकीय पक्ष हा लोकशाही तत्त्वांचे काटेकोरपणे अनुसरण करीत नाही, म्हणून त्याची दखलच घेण्याची गरज नाही, असे निवडणूक आयोगाला वाटते. मग आतापर्यंत त्याच राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखाली निवडणुका झालेल्या आहेत. अशाप्रकारे निवडून आलेल्या उमेदवारांना आयोगाने प्रमाणपत्रेही दिलेली आहेत. म्हणूनच आयोगाच्या शिवसेनेच्या बाबतीत आतापर्यंतच्या भूमिकेकडे कसे पाहायचे, या प्रश्नाचे उत्तर आयोगाला द्यावे लागेल.

## मातृभाषा दिन

# मातृभाषा ही ईश्वरी देन

जगात कुठेही जा परंतु मातृभाषेला विसरू नका. कारण इंग्रजी भाषेमुळे जगातील २३५० भाषा मरणपंथाला लागल्या आहेत. तर काही भाषांचे अस्तित्व पूर्णतः पुसले गेले आहे. यामध्ये उत्तर-मध्य अमेरिका २२२, दक्षिण अमेरिका २२६, युरोप/रशिया १४८, आशिया ६९३, आफ्रिका ४२८, ओशियाना ७३३ इत्यादी खंडामध्ये अशी मातृभाषेची गंभीर परिस्थिती असल्याचा उल्लेख जागतिक भाषा समितीच्या निष्कर्षात केला आहे. त्यामुळे प्रत्येक खंडाने व देशांनी आपली मातृभाषा वाचविण्यासाठी कटिबद्ध असायला हवे. आज प्रत्येक देशात मातृभाषेला महत्त्व आहे. त्याचप्रमाणे भारतात सुध्दा प्रत्येक राज्यात मातृभाषेला तेवढेच महत्त्व आहे आणि असायलाच पाहिजे. मातृभाषा शिकविली जात नसून जन्मताच अवगत असते, याला 'ईश्वरी देन' सुध्दा म्हणता येईल. त्यामुळे जगातील कोणतीही व्यक्ती असो, त्याला आपल्या मातृभाषेचा गर्व आणि अभिमान असणे साहजिकच आहे. जगामध्ये प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचे महत्त्व कळावे या उद्देशाने नोव्हेंबर १९९९ मध्ये यूनेस्को येथे आंतरराष्ट्री आला. कारण २१ फेब्रुवारी १९५२ मध्ये ढाका युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्कालीन पाकिस्तान सरकारच्या भाषा नीतीचा विरोध केला होता. कारण त्यांना आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवून ठेवायचे होते.प्रदर्शनकारी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी होती की बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा मिळावा. परंतु, अशा परिस्थितीत पाकिस्तान पोलीसने प्रदर्शनकारी विद्यार्थ्यांवर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. परंतु विरोध थांबला नाही. अंततः पाकिस्तान सरकारला बांग्ला भाषेला अधिकारीक दर्जा द्यावा लागला. मातृभाषेच्या आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या युवकांना श्रध्दांजली देण्यासाठी यूनेस्कोने नोव्हेंबर १९९९ ला जनरल कान्फरन्समध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला व २१ फेब्रुवारी ही तारीख ठरविण्यात आली. तेव्हापासून संपूर्ण जगात २१ फेब्रुवारी हा 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस' साजरा केला जाऊ लागला. संयुक्त राष्ट्रानुसार जगात बोलल्या जाणाऱ्या एकूण भाषा साधारणतः ६९०० आहेत. यात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या १० भाषेमध्ये जापानी, इंग्रजी, रूसी, बांग्ला, पोर्तुगाली, अरबी, पंजाबी, मंदारिन, हिंदी आणि स्पॅनिश इत्यादी आहेत. भारताचा विचार केला तर मातृभाषेला आगळे वेगळे महत्त्व दिसून येते.

भारतात प्रत्येक ४० किलोमिटर नंतर आपल्याला भाषा बदलताना दिसते. ज्याप्रमाणे म्हटले जाते, 'कोस-कोस पर बदले पानी, चार कोस पर वाणी' याप्रमाणे भारतात मातृभाषा बदलताना दिसते.

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी जरी असली तरी प्रत्येक ४० किलोमीटर नंतर लोकांच्या राहणीमानासह भाषांमध्ये संस्कृतीमध्ये आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचा गोडवा पाहायला मिळतो. भाषेचा विचार केला तर भारताची भाषा व संस्कृती ही जगावेगळी असल्याचे दिसून येते. भारतात अनेक जातींचे, पंथाचे, धर्माचे लोक राहतात. भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्याची मातृभाषा वेगळी आहे. त्यातही प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ४० किलोमीटरच्या अंतरावर भाषेचा वेगळा गोडवा दिसून येतो. भारतात हिंदी, 'दिल की धडकन, तो मातृभाषा दिल की आवाज' या पध्दतीने मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा सन्मान केला जातो.

वर्ल्ड लँग्वेज डेटाबेसनुसार २२ व्या संस्करण इथोनोलॉजच्यानुसार जगातील २० सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची भाषा मानली जाते. ज्याप्रमाणे मातृत्व आणि पितृत्व महत्त्वाचे आहे, त्याचप्रमाणे प्रत्येक देशाची मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषा महत्त्वाची असल्याचे मी समजतो. जगात अनेक भाषांचे भंडार आहेत यात दुमत नाही. त्या संपूर्ण भाषा अवगत केल्याही पाहिजे यामुळे ज्ञानाचा भंडार वाढतो. परंतु त्या भाषेच्या आड मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. आजही भारतात इंग्रजी भाषेला जास्त महत्त्व दिला जाते. भारतातील नामांकित व्यक्ती किंवा हायप्रोफाइलमध्ये राहणारे व्यक्तीसुद्धा इंग्रजी भाषेला महत्त्व देऊन मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेला विसरताना दिसतात. याला सरकारने कोठेतरी थांबविले पाहिजे. यामुळे मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा अपमान होतो. जगातील कोणताही देश असो प्रत्येकाची मातृभाषा म्हणजे पूर्वजांचा एक ठेवाच आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील लोकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतेही कार्य करताना किंवा बोलताना मातृभाषेला प्रथम स्थान द्यायला पाहिजे. प्रत्येकांची मातृभाषा ही त्या-त्या संस्कृतीनुसार अवगत असते. त्यामुळे आपण जर बाहेर निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर नंतर आपल्याला प्रत्येक भाषेत थोडा-थोडा बदल झालेला दिसतो. सांगायचे तात्पर्य की देशात किंवा जगात कुठेही जावे, परंतु मातृभाषेचा विसर पडणार नाही याची काळजी सर्वांनीच जातीने घेतली पाहिजे. जगातील संपूर्ण भाषेचा व संस्कृतीचा अभ्यास करायलाच पाहिजे. परंतु आपल्या संस्कृतीला किंवा मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी सुध्दा घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत आपण पाहतो आई-बाबा, काका-काकू, मामा-मामी, आजी-आजोबा इत्यादी अनेक जुन्या शब्दांना विसरून मम्मी, डॅडी, पप्पा, मॉम, अन्टी, ग्रँडफादर इत्यादी अनेक इंग्रजी शब्दांचा वापर होताना आपण पाहतो. त्याचप्रमाणे मामी-मामा, काका-काकू, माऊशी-माऊसाजी या शब्दाला आगळे-वेगळे महत्त्व आहे. कारण यातूनच नात्याची वेगवेगळ्या पद्धतीने ओळख दिसून येते. परंतु आता या नावाचे महत्त्व विसरून या सर्वांना अन्टी व अंकलमध्ये परिवर्तित केल्याचे दिसून येते. यामुळे खरे नाते कोणते हे कळतच नाही. याचा परिणाम मातृभाषेवर होऊ शकतो याला नाकारता येत नाही.




भारतात १९,५०० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत, हा सुध्दा भारताचा इतिहासच आहे. प्रत्येकाने जर आपल्या मातृभाषेचा सटीक वापर केला तर भारतातील प्रत्येक व्यक्तीला अनेक भाषा आपोआपच अवगत होतील व सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात भाषेचा भंडार आपोआप निर्माण होईल. यामुळे प्रत्येकाचे भाषेचे ज्ञान मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होईल. भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की लोकसभेत किंवा राज्यसभेत काही सांसद मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषा (हिंदीचा) वापर न करता इंग्रजी भाषेचा वापर करतात यावर आंतरराष्ट्रीय मातृभाषेच्या निमित्ताने अंकुश लावण्याची गरज आहे. कारण अनेक देशांत आताही त्यांच्याच देशातील भाषा बोलल्या जाते. उदाहरण द्यायचे झाले तर जापान, चीन, स्पेन, अरबी, रशिया, जर्मनी, इस्त्राईल इत्यादी अनेक. त्यामुळे भारतातील प्रत्येक भाषेला महत्त्व देण्याची आवश्यकता आहे. मी देशातील जनतेला हेच सांगू इच्छितो की इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषा किंवा राष्ट्रीय भाषेचा उपयोग जास्तीत जास्त केला तर येणारी पिढी याचे स्वागतच करेल. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचे औचित्य साधून जगातील संपूर्ण देशांनी निसर्गाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. भूकंप व वाढत्या तापमानामुळे समुद्राची पातळी वाढणे यामुळे पृथ्वीमातेचे संतुलन डगमगत आहे. याकरिता सर्वांनीच वृक्ष लागवडीचा संकल्प घ्यायला हवा. कारण आज ज्याप्रमाणे गरज आहे, मातृभाषेच्या रक्षणाची त्याचप्रमाणे पृथ्वी ही सर्वांचीच माता आहे. तिला वाचविण्यासाठी भारतासह जगभरातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे.

**- रमेश लांजेवार,**
माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर.

## प्रासंगिक

# आधुनिक विचारांचा नायक

काळानुरूप बदलत गेले पाहिजे. आजच्या संगणकीय युगात वावरत असताना आधुनिक पाऊले टाकत जन जीवन गतिमान केले पाहिजे, हाच विचार मनात ठेवून आज शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची धडपड चालू दिसते. सतत नवीन काहीतरी करून दाखवण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असतो.

कष्ट, परिश्रम, जिद्द आणि चिकाटी या गोष्टीवर त्यांची अढळ श्रध्दा आहे. म्हणून प्रत्येक गोष्ट करताना त्याचा मूळ अभ्यास ते करतात आणि त्यानंतरच त्यावर ते निर्णय घेतात. आधुनिक युगात वावरत असताना काय केले पाहिजे याबाबत ते नेहमी चिंतनशील दिसतात आणि योग्य ती अनुरूप पाऊले ते टाकतात. अनेक युवकांना त्यांनी व्यावसायाच्या माध्यमातून पुढे आणले आहे. प्रत्येकाला नोकरी मिळू शकणार नाही यासाठी उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून सर्वांनी प्रगती साधली पाहिजे असे ते म्हणताना दिसतात. कर्तुत्वातून नेतृत्व पुढे येते असे आपण म्हणतो याप्रमाणेच शिवबाबाचे नेतृत्व कर्तुत्वाने पुढे आले आहे. त्यांना मिळालेल्या अकलूज सरपंच पदाच्या संधींचे त्यांनी सोने करून दाखवले. विकास तर होणारच होता.



मात्र, अकलूज ग्रामपंचायतीला आधुनिकतेची जोड त्यांनी दिली. ई प्रणाली राबवून कर आकारणी सुलभ आणि पारदर्शक केली. अकलूज ई लाईव्हच्या माध्यमातून कॅमेराबध्द केले, याचा फायदा गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी तर झालाच पण चौकाचौकातील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी याची मदत झाली. त्यामुळे ट्रॅफिक समस्या, अनियंत्रित पार्किंग यावर नियंत्रण निर्माण झाले. शांत स्वभाव आणि कमी बोलणे ही शिवबाबाच्या स्वभावाची खासियत असली तरी ते विकास कामांबाबत खूपच आक्रमक आणि अग्रेसीव वाटतात. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते--पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना आपल्या बंधूंच्या सहवासात राहून आपल्या परिसराचा कायापालट झाला पाहिजे यासाठी त्यांची खटाटोप दिसते. अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे असणारे शिवबाबा सतत कामामध्ये स्वतः ला गुंतवून घेतात. नवनवीन गोष्टी शिकण्याची नेहमी त्यांची धडपड असते. कोरोना काळात ई संवादाच्या माध्यमातून समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. अनेकांना या काळात त्यांनी मदत केली माणुसकी जपली. शिवशंकर बजारच्या माध्यमातूनही डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांना जास्तीत जास्त सवलती देण्याचा नेहमी त्यांचा प्रयत्न असतो. आनंदी गणेश ट्रस्टच्या माध्यमातून देखील विविध सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी स्वीकारून समाजाप्रती असणारे ऋणानुबंध ते जपताना दिसतात. वडील कै. उदयसिंह मोहिते -पाटील यांनी नेहमीच समाजाप्रती आदर भावना जपत नेहमी मनात सहकार्याची भावना ठेवली याची जाणीव मनात ठेवून शिवबाबा वाटचाल करताना दिसतात. असो शिवबाबा हे एक तरुण तडफदार युवा नेतृत्व आहे. नवीन विचाराने प्रेरित होऊन कार्य करताना दिसत आहे. नवनवीन उपक्रम राबविण्याचा नेहमी त्यांचा मानस असतो. त्यांच्या या धडपडी वृत्तीचा नक्कीच येथील व्यवस्थेला फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्यामुळे आधुनिक नवीन विचारांचा चेहरा येथील जनतेला गवसला आहे. त्यांच्या नेतृत्वात कै. उदयसिंह मोहिते- पाटील यांची छबी दिसते. यश, कीर्तीने त्यांचे जीवन भरभरून जावे याच त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...

**- डी. एस. गायकवाड, अकलूज.**

## जन्म हा अखेरचा

## ज्ञानाचारस्थल



अर्ध्या श्लोकातच सांगतो,

**'श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथ कोटिभि: ।**
**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मेव नापर:।।'**

केवळ अर्ध्या श्लोकात श्रीशंकराचार्यांनी आपल्या ग्रंथांचे सार सांगितले आहे. ब्रह्म सत्य आहे, जग मिथ्या आहे आणि जीव ब्रह्म आहे. जीव स्वत:ला जीव म्हणवतो, परंतु वस्तुत: तो जीव नसून शिवच आहे. जीवावस्थेत देखील तो शिवाचाच अंश असतो. जीव हा शिव आणि शिव तर शिवच आहे. अशा दोन्ही शिवांचे जे अद्वैत तेच शिवाद्वैत. जीवाने शिवत्व प्राप्त करुन घेतल्यावरच त्याला शिवाशी समरस होता येते. पाण्यात पाणी, दुधात दूध एकरुप व्हावे त्याप्रमाणे. जो शिव बाह्य जगतात आहे तोच आपल्या आत्मरुपात देखील आहे. हे ज्ञान ज्याला होते, तोच शिवज्ञानी होय. हे ज्ञान सोडून अन्य ज्या कशाला ज्ञान असे म्हटले जाते, ते ज्ञान नसून अज्ञात आहे. तुम्हांला गणिताचे ज्ञान असेल तरी ते पुरेसे आहे आणि जर तुम्हांला शिवाद्वैतज्ञान नसेल आणि इतर सारे ज्ञान असले तरी ते काही उपयोगाचे नाही. 'एक विज्ञानेन सर्व विज्ञानम्' एकाला जाणल्याने सर्व ज्ञान होते अशी वस्तू परब्रह्म हीच होय. एका शिवाला जाणले म्हणजे सर्व प्रपंचाला जाणले असे होते.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# वैद्यकीय शिक्षण परवडणारे हवे

महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू केली जाणार असल्याची बातमी समाधान देणारी आहेच. एक चांगला व गरजेचा निर्णय म्हणावा लागेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक लाख मोलाची ही भेटच ठरावी. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला घराच्या जवळ राहून शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होईल. त्याचा वेळ, खर्चासह अनेक गोष्टींची बचतही होईल हे वेगळेच. मात्र, दिवसेंदिवस अत्यंत महागडे वैद्यकीय शिक्षण होत असल्यामुळे विद्यार्थ्यांची पात्रता, हुशारी, वैद्यकीय शिक्षणाकडे असलेली ओढ आणि इच्छा असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे अनेक सामान्य मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना मन मारावे लागते, शिक्षणापासून वंचित राहावे लागते. शासनाने याकडे लक्ष देऊन मध्यमवर्गीयांनाही वैद्यकीय शिक्षण परवडेल त्यांच्या आवाक्यात राहील यासाठी मार्ग शोधणे, पाऊले उचलणे गरजेचे वाटते.



**- विश्वनाथ पंडित, चिपळूण.**

### सर्वसामान्यांकडे सोईस्कररित्या दुर्लक्ष

सर्वसामान्य माणसाने टॅक्स, घरपट्टी, पाणीपट्टी वेळेत भरली नाही तर लगेच नोटीस येते. पण, राजकीय व्यक्ती, धनाढ्य लोक यांना मात्र सवलती दिल्या जातात. अनेक वेळा शासकीय ऑफिसांकडे थकबाकी असते. या बातम्या येतात तेंव्हा आपण सर्वसामान्य आहोत याची खंत वाटते.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

# आता वेळ स्मार्ट पेपर लिहिण्याची...

मुळात शिकणं ही मुलांची नैसर्गिक प्रेरणा आहे. कुणीही न शिकवता मुलं शेकडो खेळ शिकतात, आपले आपण नवे खेळ निर्माण करतात ते कोणतीही परीक्षा द्यायची असते म्हणून नाही. परंतु आपल्याकडे मुलांची गुणवत्ता त्यानी मिळवलेल्या परीक्षेतील गुणा वरून ठरवले जाते. त्यामुळे अवास्तव परीक्षेला महत्त्व प्राप्त होऊन गुणांसाठी सर्व ठिकाणी स्पर्धा दिसते. त्यातली त्यात दहावी बारावी परीक्षेला तर खूपच महत्त्व दिले जाते. बारावीच्या विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेचा अनुभव घेतलेला असतो, पण दहावीचे विद्यार्थी 'बोर्ड' या नावानेच अर्धे घाबरलेले असतात. त्यामुळे चांगला अभ्यास, पाठांतर करूनही उत्तरपत्रिका व्यवस्थितपणे लिहिता येत नाही. त्यामुळे गुण कमी पडतात. मुलांची बोर्डाची भीती दूर व्हावी आणि उत्तम पद्धतीने उत्तरे लिहिता यावीत म्हणून काही मुद्दे.

सर्वात प्रथम दररोज पेपरला निघताना सर्व साहित्य घेतले का? याची खात्री करा. एक तास अगोदर पेपरला पोहोचा. बेंचवर टाकलेला नंबर आपलाच आहे खात्री करून शांतपणे चिंतन, मनन करत बसा. जे जे वाचले किंवा अभ्यास केला आहे ते आठवा. उत्तरपत्रिका हातात पडताच अर्धा इंच दोन्ही बाजूने समास आखावा. त्यामुळे आपलं लिहिलेलं उत्तर घडीच्या आत किंवा उत्तर पत्रिका फाटल्यास जाणार नाही. ते सेफ राहिलं.

प्रश्नपत्रिका मिळताच सर्व प्रश्नांवर नजर फिरवून तुम्हाला एकूण प्रश्नांपैकी जो तुम्हाला सोपा वाटतोय व पूर्ण प्रश्नाचे उत्तर लिहिता येतेय तो प्रश्न लिहिण्यास घ्या. उत्तर येतंय म्हणून घाई करू नका. प्रश्न वाचून समजून घ्या. कारण घाईघाईत वाचन केल्याने मुख्य मुद्दा दुर्लक्षित राहून उत्तर चुकू शकते. बोर्डाने कुठेही असे सांगितले नाही की प्रश्न क्रमांकानुसारच उत्तरपत्रिका सोडवा. तुम्हांला जो प्रश्न आवडेल, सोपा वाटेल तो सोडवा. खात्री असलेले प्रश्न आधी सोडवावे. त्यामुळे पेपर तपासणाऱ्यावर चांगले 'इम्प्रेशन' पडेल.

परीक्षांचा अभ्यास करताना विद्यार्थी अधिकाधिक भर पाठांतर, घोकंपट्टी यावर देतात. या सगळ्यांमध्ये लिखाणाच्या कौशल्याकडे मात्र दुर्लक्ष होऊन परीक्षेत चारपाच पाने अक्षर चांगले नंतर नंतर खराब होत जाते. उत्तरपत्रिकांमध्ये लिखाणातील सुसूत्रता, वळणदार अक्षरे, सुटसुटीतपणा, नीटनेटकेपणा यांचा बराच प्रभाव गुणावर पडतो. म्हणून शेवटपर्यंत अक्षर एकच राहिल याची काळजी घ्या. आपला पेपर साधारण ३० ते ३५ पानांचा असतो. याशिवाय सप्लिमेंटची सुविधा असते. त्यामुळे पेपर सुटसुटीत आणि स्वच्छ वाटेल असा सोडवा.

उत्तरलेखनात कृत्रिम किंवा पुस्तकी भाषा टाळून स्वत:च्या भाषेतील उत्तरेच प्रभावीपणे मांडा. अनावश्यक उत्तरे लिहू नका. खूप पेपर लिहिला आहे असे भासवण्यासाठी अनावश्यक लिखाण करू नका. प्रत्येक प्रश्नाचे गुण पहा व गुणांच्या दृष्टीने जेवढे आवश्यक लिखाण अपेक्षित आहे तेवढेच लिहा. उत्तर येतंय म्हणून जास्त लिहित बसू नका. वेळ कमी पडेल. आपण कोणत्या प्रश्नाचे उत्तर लिहितोय तो प्रश्न क्रमांक, उप प्रश्न क्रमांक सुरुवातीलाच समासामध्ये लिहा. बऱ्याच वेळा आकडा टाकायचा राहतो. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सुटसुटीत, स्वच्छ, सुंदर पध्दतीने स्वतंत्र पानावर लिहा. एकाच पानावर दोन-तीन प्रश्नाची उत्तरे नको.

हुकमी गुण मिळवून देणारे प्रश्न जसे रिकाम्या जागा, जोड्या लावा यासारखे प्रश्न पटकन पहिल्यांदा सोडवा. त्यातील ही ज्याची खात्री आहे तेच सोडवा राहिलेले शेवटी लिहा. पेपर सोडवताना आधी सोपे प्रश्न किंवा आधी कमी लिहिण्यासारखे मार्क मिळवून देणारे प्रश्न शांतचित्तानं सोडवावेत. त्यांना वेळ कमी लागतो.



भाषा विषयाची प्रश्नपत्रिका सोडवताना व्याकरण शुद्ध असेल याकडे लक्ष द्या. व्याकरणात्मक चुका किंवा अशुद्ध लिहिणे टाळले पाहिजे. तसेच निबंधासारखा किंवा पत्र लेखन, जाहिरात, कथा लेखन करताना विशिष्ट शब्दमर्यादेत लिहिणे अपेक्षित असते. त्यात वेगवेगळ्या म्हणी, वाक्यप्रचार, चारोळी यांचा आधार घेतल्यास गुण अधिक मिळतील.

कोणत्याही प्रश्नाचे उत्तर लिहिताना शब्द मर्यादा पाळा. उत्तरात फाफटपसारा लिहू नका. नेमके व मुद्देसूद उत्तर लिहा. लक्षात ठेवा खाडाखोड, गिचमिड करणे यासारख्ये प्रकार तुमच्याबद्दलचे मत प्रतिकूल होऊ शकते. गणित व विज्ञान विषयात आकृती, सूत्र, चार्ट व्यवस्थित काढा. उगाच त्यावर गिरवत बसू नका.

शेवटी आपल्याला उत्तरपत्रिका किती वेळात संपवायची आहे. याचे भान पेपर लिहिताना असणे आवश्यक आहे. त्याकरिता सतत घड्याळावर नजर ठेवा. एखादा प्रश्नांचे उत्तर येत नसेल तर ताण घेऊ नका. पेपर संपल्यानंतर प्रश्नसंबंधी किंवा पेपरविषयी चर्चा करू नका. हे सर्व मुद्दे लक्षात ठेऊन प्रश्नपत्रिका लिहा. नक्कीच चांगले गुण मिळतील. विद्यार्थी मित्रांनो कष्टाशिवाय पर्याय नाही. उगाच पेपर आहेत म्हणून रात्र रात्र जागरण करून अभ्यास करू नका. शरीरासाठी आहार, झोप महत्त्वाची आहे. चला तर मंग आता अभ्यास, पाठांतर झाले. आता स्मार्टवर्क करण्याची वेळ आली आहे.... सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा...

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कोरवलीत प्रेम संबंधाच्या कारणावरून प्रियकराचा खून

✔ सुराज्य/विरवडे (बु.)

**प्रेम संबंधाच्या कारणावरून प्रेयसीने व तिच्या साथीदारांनी एका ४५ वर्षीय प्रियकराचा धारदार शस्त्राने खून केल्याची घटना कोरवली ते वाघोली शिवेवर सोमवारी उघडकीस आली. लक्ष्मण येताळा व्हळगुंडे (रा. औंढी) असे मृत प्रियकराचे नाव आहे. या संदर्भात महिलेसह तिच्या साथीदारावर कामती पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.**

कामती पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार, मृत लक्ष्मण हा औंढी ता. मोहोळ येथील शेतातील वस्तीवर राहत होता. त्याचे कुरूल येथील एका महिले बरोबर प्रेम संबंध होते. त्यांची आपसात सारखी भांडणे होत होती. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापूर्वी त्या महिलेस लक्ष्मण बरोबर असलेले प्रेम संबंध सोडण्यास सांगितले होते. त्यावेळी त्या महिलेने लक्ष्मणला जीवे ठार मारूनच प्रेम संबंध सोडते असे बजावले होते. रविवारी सकाळी लक्ष्मण हा मेथीची भाजी विकण्यासाठी औंढी गावात आला होता.

दरम्यान लक्ष्मणचा भाऊ हरी व्हळगुंडे हा कामावरून सायंकाळी घरी आला असता त्याने भावजय जवळ लक्ष्मण बाबत चौकशी केली असता, तिने मी सकाळी सात वाजता पती लक्ष्मण यांना फोन केला होता. त्यावेळी त्यांनी मी त्या प्रेयसी सोबत आलो आहे, नंतर फोन करतो, असे सांगितल. नंतर फोन बंद केल्याचे दिर हरी यास सांगितले.



सोमवारी सकाळी हरी घरी असताना औंढी गावचे पोलीस पाटील सिताराम भुसे यांनी लक्ष्मणला सांगितले की, तुझ्या भावाचा कोरवली ते वाघोली शिवेवर खून झाला आहे. ही माहिती मिळताच मृत लक्ष्मण चा भाऊ हरी व इतर नातेवाईक घटना स्थळावर गेल्यावर त्या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यावेळी मृत लक्ष्मण याची मोटर सायकल क्र एम एच १३ बीएल ०२६१ ही रस्त्यावर लावलेली होती. तिच्यावर रक्त सांडलेले होते. मोटार सायकल पासून ९० फूट अंतरावर लक्ष्मण हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या होता.

त्याच्या तोंडावर मानेवर व डोक्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे भाऊ लक्ष्मण व इतरांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी लक्ष्मण यास कामती येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता डॉक्टरांनी त्यास तपासून उपचारा पूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची फिर्याद हरी येताळा व्हळगुंडे (वय ३६ रा. औंढी) याने कामती पोलिसात दिली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने हे करीत आहेत.

## पेहे येथे सत्तुरने मारहाण; एक जखमी

✔ **सोलापूर** : पेहे तालुका पंढरपूर येथे भांडण सोडविण्यास गेले असता सत्तुर आणि दगडाने केलेल्या मारहाणीत विजय पोपट सदगर (वय ४५, रा.पेहे) हे गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास पेहे येथील सहारा हॉटेल मध्ये घडले. रात्रीनऊ वाजेच्या सुमारास गावातील सहारा हॉटेलमध्ये भांडण झाले होते. ते सोडवण्यास सदगर गेले होते. त्यावेळी विभीषण बंडगर याने मारहाण केली. त्यांना करकंब येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## मंडपावरून पडल्याने तरुण जखमी

✔ **सोलापूर** : शहरातील हुतात्मा स्मृती मंदिरा जवळ असलेल्या एका मंडळाचे एलईडी स्क्रीन काढत असताना १५ फूट उंचीवरून पडल्याने बाबा हनुमंतु शिंदे (वय २४, राहणार घाटंगरे जि.उस्मानाबाद) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर बाजार पोलिसात याची नोंद झाली आहे.



## बाळे येथील स्मशानभूमीची कामे त्वरित मार्गी लावण्याची मागणी

✔ **सोलापूर** : बाळे येथील स्मशानभूमीची दुरावस्था झाली आहे. लवकरात लवकर येथील कामे करावीत, अशी मागणी बाळे भागातील भाजपचे नेते आनंद भवर, राजू आलुरे आणि पदाधिकाऱ्यांनी पालिका आयुक्त शितल तेली उगले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. बाळे भाग १९९२ साली सोलापूर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाला. तेंव्हा पासून आजतागायत येथील स्मशानभूमीमध्ये प्राथमिक सुविधा नाहीत. याबाबत महापालिकेस वारंवार कळवण्यात आले आहे. येथे पाणी, विजेची समस्या आहे. दहन शेड, दहन गार्डची गरज आहे. स्मशानभूमीत अतिक्रमण झाले आहे, त्याचा बंदोबस्त करावा, स्मशान भूमी हद्दी खुणा, मोजणी करून वॉल कंपाऊंड करणे, स्मशान भूमीमध्ये वॉचमन व मृत्यू नोंद करून दाखला देण्याची सोय करणे. आसन व्यवस्था करावी, अशी मागणी भंवर यांनी केली आहे. याबाबत वेळीच कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे. यावेळी राजाभाऊ आलूरे, समाधान आवळे, शिरीष सुरवसे, अमोल झाडगे, राम भोगे आदी उपस्थित होते.



## हिंदू वॉरियर्स प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती

✔ **परंडा** : हिंदू वॉरियर्स प्रतिष्ठानच्यावतीने महाराणा प्रताप चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन व शिवआरती करण्यात आली. यावेळी माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, जाकिरभाई सैदागर, सुभाषसिंह सद्दिवाल, नवनाथ जगताप, सुबोधसिंह ठाकुर, काका साळुखे, संजयकुमार बनसोडे, नाना पवार, बाळासाहेब गायकवाड, आब्बास मुजावर, शाम मोरे, अनिलदादा देशमुख, विकास कुलकर्णी, वैभव पवार, हनुमंत पाटील, धनंजय जाधव, नागेश काशिद, समिर पठाण, सुरेश काशिद, राहुल जगताप, मनोज जगताप, बप्पा बकाल, लक्ष्मण मोरे, प्रतिष्ठानचे संस्थापक धिरजसिंह ठाकुर, अध्यक्ष उमेश घाडगे, गणेश चोपडे, प्रमोद बोराडे, दया बोराडे, प्रमोद गटकुळ, आण्णा लोकरे, तुषार नेटके, धनाजी पुरी, कुनाल जाधव, सनी काशिद, शुभम ठाकुर,जयराम धनवे, मदन दिक्षित, वैभव मस्के, मयुर जगताप, अमोल भिसे, विनायक काटवटे, मयुर लोंखडे, व्यंकटेश दीक्षित, रामदास मस्तुद, आकाश काशिद, संदीप सुतार, आदर्श ठाकुर आदित्य नांगरे आदी उपस्थित होते.

# स्वत:च्या लग्नासाठी ड्रायव्हरने मालकाच्या घरात केली चोरी; १० लाखांची रक्कम हस्तगत

✔ सुराज्य/सोलापूर

### गुन्हे शाखेने बारा तासात लावला छडा

एकीकडे घरची परिस्थिती गरीब दुसरीकडे वाढतं वय बघून कोणी लग्न करायला तयार नाही या हेतूने ड्रायव्हरने चांगलीच शक्कल लावत स्वतःच्या लग्नासाठी मालकाच्या घरात दहा लाख रुपयांची रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी या घटनेचा बारा तासात छडा लावत ड्रायव्हरला ताब्यात घेऊन त्याच्याकडून रक्कम हस्तगत केली. त्यानंतर त्याला न्यायालयात उभे केले असता, न्यायालयाने ड्रायव्हरला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे.

परिस्थिती गरिबीची होती, त्यामुळे लग्न जुळत नव्हते. सोबत लाखो रुपये असतील तर लग्न जुळेल. या भ्रमात ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीने शक्कल लढवली.आणि संधी येताच त्याने चक्क मालकाच्या घरावरच दरोडा टाकून तब्बल दहा लाख रुपयांची लूट केली. परंतु ही चोरी त्याला जास्त वेळ पचली नाही. आणि केवळ १२ तासाच्या आत शहर गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला सिव्हिल हॉस्पिटल जवळ असलेल्या पोटफाडी चौकात त्यास ताब्यात घेऊन जेरबंद केले. नागेश ऊर्फ अमित सूर्यकांत भरडे (वय-३४, उत्तर कसबा, टिळक चौक, सोलापूर) असे त्या चोरट्या ड्रायव्हरचे नाव आहे.

या घटनेची हकीकत अशी की, संतोष विजयकृष्ण कुलकर्णी यांचे जुळे सोलापूर येथे व्दारकादीश मंदिरा समोर सानवी अपार्टमेन्ट येथे फ्लॅट आहे.तसेच सध्या ते इंद्रधनु येथील फ्लॅट मध्ये राहत आहेत. संतोष कुलकर्णी यांनी त्यांच्या शेतीच्या उत्पन्नातुन मिळालेली १० लाख रुपये रोख रक्कम ही त्यांचे सानवी अपार्टमेंन्ट येथील फ्लॅटच्या बेडरूम मधील लाकडी कपाटात डिसेंबर २०२२ मध्ये विभागुन ठेवली होती. त्या ठिकाणी त्यांचे ड्रायव्हर व मित्रांचे येणे जाणे होते. दि.५ फेब्रुवारी २०२३ रोजी संतोष कुलकर्णी यांनी त्यांचे सानवी अपार्टमेन्ट येथील बेडरूमच्या कपाटात ठेवलेली रक्कम घराचा कडी-कोंयडा तोडून चोरून नेली. याबाबत त्यांनी सर्वत्र चौकशी केली शेवटी विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर यांच्या पथकाने तपास करत चोरलेल्या रक्कमेतील काही रक्कम घेऊन सोलापूर सोडण्याच्या बेतात असतानाच शहर गुन्हे शाखेने त्या आरोपीस पोटफाडी चौकात अटक केली. तसेच चोरलेली पूर्ण रक्कम त्याने परत केली व पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर, राजु मुदगल, कुमार शेळके, महेश शिंदे, कृष्णात कोळी, सिध्दाराम देशमुख, प्रविण शेळकंदे, रत्ना सोनवणे, सतीश काटे या पथकाने ही कामगिरी केली.

## बोहिरे येथे बांधाच्या कारणावरून बॅटने मारहाण; पिता-पुत्र जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

भाऊकितील शेताच्या बांधाच्या वादातून लाकडी बॅट आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत पिता-पुत्र जखमी झाले. ही घटना बोहिरे (ता. मोहोळ) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यापैकी तरुणाची प्रकृती गंभीर आहे.

श्रीनाथ युवराज साठे (वय २६) आणि त्याचे वडील युवराज पंढरी साठे (वय ६० दोघे, रा.बोहिरे) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी श्रीनाथ साठे याची प्रकृती गंभीर आहे. सोमवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास दोघे गावातून जात होते. त्यावेळी शरद रमेश साठे आणि अमर साठे या दोघांनी त्यांना वाटत अडवून मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### आजारात कंटाळून महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

शहरातील रविवार पेठेत राहणाऱ्या वैशाली शंकर जाधव (वय ३५) हिने आजारास कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी दुपारच्या सुमारास तिने घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतली होती.

तिला फासातून सोडवून शंकर जाधव (वडील) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात पोलिसात झाली आहे



## गंभीरगडावर ट्रेकिंग करून शिवरायांना अभिवादन!

✔ **सोलापूर** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सोलापूर आणि पालघर येथील शिवप्रेमींनी गंभीरगडावर ट्रेकिंग करून महाराजांना आगळ्या वेगळ्या पद्धतीने अभिवादन केले. डहाणू तालुक्यातील व्याहाळी गावातून गंभीरगड ट्रेकिंगला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज की जय.., छत्रपती संभाजी महाराज की जय.., भारत माता की जय..च्या घोषणा देत सर्व शिवप्रेमी गडावर पोचले. उंचावरून दिसणारे निसर्ग सौंदर्य पाहून सर्वजण आनंदून गेले. शिवराय आणि गडदेवतेला अभिवादन करण्यात आले. गडावरुन खाली आल्यानंतर गावरान जेवणाचा आस्वाद घेऊन पुढील प्रवासाला सुरुवात झाली. ट्रेकिंगसाठी व्याहाळी गावचे उपसरपंच महेश रिंजड आणि स्थानिक गावकरी रामजी, रुपजी, स्वप्निल, मुकेश यांचे सहकार्य लाभले. या ट्रेकिंगमध्ये पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, लेखाधिकारी मनोज पवार, कृषी विस्तार अधिकारी सुरज जगताप, सोलापूर महानगरपालिका घनकचरा विभागाचे सफाई अधीक्षक नागेश मेंडगुळे, सोलापूर महानगरपालिका पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, शिक्षण विभागाचे वरिष्ठ लिपिक अरविंद ताटे, हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक मदन पोलके, वसुंधरा मित्र परशुराम कोकणे, सरदार वल्लभभाई पटेल इंजिनिअरिंग कॉलेजचे प्रकल्प व्यवस्थापक उमाकांत बिरादार, पालघर जिल्हा परिषदेचे निवृत्त वरिष्ठ कर्मचारी मिलिंद मोरे, विरार येथून गडप्रेमी अभिषेक परुळेकर, अंकुश केळवेकर सहभागी झाले होते.

## कुलूप तोडून ४ लाखांचे दागिने पळविले

✔ **सोलापूर** : परमेश्वर पिंपरी येथे यात्रेसाठी गेले असता एका वकिलाच्या बंद घराचा कडीकोयंडा तोडून चोरट्याने रोख रकमेसह ३ लाख ९० हजाराचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी कामती (ता.मोहोळ) येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. या संदर्भात विठोबा शिवाजी पुजारी (रा. कामती) या वकिलांनी कामती पोलिसात फिर्याद दाखल केली. ते शनिवारी रात्री घराला कुलूप लावून परमेश्वर पिंपरी येथे देवदर्शनासाठी गेले होते. सकाळी परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने त्यांच्या बंद दरवाजाचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली. त्यानंतर फर्निचरच्या कपाटातील ८० हजार रुपये रोख, ७४ ग्राम सोन्याचे दागिने, मोबाईल आणि कॅमेऱ्याचे डीव्हीआर आदी चोरून नेला. अशी नोंद कामती पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार माने करीत आहेत.



# ब्रिजधाम आश्रमात सदाबहार गीतांचा कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

सोरेगाव येथील ब्रिजधाम वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या मनोरंजनासाठी मसीजा ग्रुपच्या वतीने हिंदी मराठी चित्रपट सृष्टीतील सदाबहार गीताचा कार्यक्रम रविवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी ब्रिजमोहन फोफलिया यांनी संगीता विषयी आपले सखोल विचार व्यक्त करताना संगीत सर्व शक्तिशाली आहे, लोकांना अनेक समस्या आहेत, त्रास आहे, त्यात जर संगीताची साथ मिळाली तर जीवन आनंदमय होते, संगीत रसाने भरलेले एक शक्तिवर्धक टॉनिक आहे, संगीत साधूंना, देवी -देवतां सह मानव जातीला अफाट प्रिय आहे, कुठलाही कार्यक्रम संगीता शिवाय अपुरे आहे, प्रत्येक सुखदुखात संगीताची साथ आहे, संगीत साधना योग पेक्षाही मोठी आहे, संगीत मनाला स्वस्थ ठेवते, स्वास्थ्यला ठीक ठेवते, आपल्या कठीण - वाईट दिवसात संगीत ऐकल्याने वेळ सुखात बदलून जाते, नकारात्मक विचार येतात त्या वेळेला संगीत ऐकल्याने विचार चांगले होतात.



यावेळी गायक इंद्रजीत भोसले, उदयसिंह गायकवाड, संजय शिरसागर, रमेश खाडे, जगदीश हिरेमठ, पल्लवी स्वामी, भाग्यश्री बाबा, गौरी बडदाळे यांनी ऐ मालिक तेरे बंदे हम, तुळशी माळ ही श्वासाची, देहाची तिजोरी, चंद्रभागेच्या तिरी, तेरी आखो के सिवा, अच्छा जी मैं हारी, सुर तेच छेडीता, कोरा कागज था ये मन मेरा, परदा है परदा, कही दीप जले कही दिल, खेळ मांडला, सत्यम शिवम सुंदरम अशी एका पेक्षा एक अविस्मरणीय गीते सादर केली. या सर्व गायक कलाकारांचा ब्रिजमोहन फोफलिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश खाडे यांनी केले.

## शरणप्पा तोरवी यांचे निधन



✔ **सोलापूर** : श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते खोखो संघटक शरणप्पा मल्लप्पा तोरवी (वय ८५) यांचे सोमवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले व एक मुली असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी रूपाभवानी येथील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. उत्कर्ष क्रीडा मंडळ आणि सोलापूर जिल्हा खोखो असोसिएशनच्या प्रचार व प्रसारात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

# पैशाच्या वादातून २ गटात हाणामारी

✔ **सोलापूर** : पैसे देण्यात घेण्याच्या वादातून लोखंडी रॉड, फायटर आणि काठीने झालेल्या मारहाणीत दोन्ही गटातील चौघेजण जखमी झाले. ही घटना बाळे येथील खंडोबा मंदिर परिसरात सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली.सर्व जखमींना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अक्षय सदाशिव खंडागळे (वय २१) प्रतापसिंह संजय चव्हाण (वय २३) आणि अण्णा भारत जगताप (वय २५ सर्व रा. संतोषनगर बाळे) असे पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. सोमवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास खंडोबा मंदिर परिसरात पैसे देण्या घेण्याच्या वादातून त्यांना संदीप जोगे, श्रीकांत गावडे, आत्माराम गावडे, बिरुदेव गावडे आणि अन्य चौघांनी रॉड आणि फायटरने मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली.

तर दुसऱ्या गटातील श्रीकांत आत्माराम गावडे (वय २४) आणि प्रमिला आत्माराम गावडे (वय ४२ रा.संतोषनगर बाळे) हे दोघे जखमी झाले.रविवारी सकाळी झालेल्या भांडणाच्या कारणावरून अक्षय खंडागळे, प्रतापसिंग चव्हाण आणि अन्य ८ ते १० लोकांनी पहाटेच्या सुमारास घरात घुसून त्यांना फायटर आणि काठीने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर ई निविदा सूचना**

महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर अंतर्गत साहित्य वाहतूक कामाकरिता महावितरणच्या नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे. निविदा क्र. EE/SUR/R/T-07/2022-23 (रु. २० लाख), निविदा विक्री दि.२१.०२.२०२३ ते दि. २८.०२.२०२३ पर्यंत, निविदा सादर करण्याची अंतिम दि.०१.०३.२०२३ दु. ०२.०० वाजे पर्यंत. इतर सर्व माहिती https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेत स्थळावर दि.२८.०२.२०२३ पर्यंत उपलब्ध आहे. सदरील निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीधारकाने राखून ठेवलेले आहेत.

**PRO/BMTZ/ 185 /2022-23**

**कार्यकारी अभियंता, महावितरण, ग्रामीण विभाग, सोलापूर**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास कळवण्यात येते की, १. मिळकतीचे वर्णन : डि. व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी, ता. उत्तर सोलापूर, मौजे मजरेवाडी, येथील नरसिंह नगर या नावाने ओळखली जाणारी मिळकत याचा जुना सर्व्हे नं. ३०५, नवा सर्व्हे नं. १३२, यासी बिनशेती प्लॉट नं. २३ ब याचे क्षेत्रफळ ३९६.०० चौ. मी. अथवा ४२६०.०० चौ.फुट, यासी चतु:सिमा - पुर्वेस : प्लॉट नं. २३, पश्चिमेस : प्लॉट नं. २५, दक्षिणेस : रस्ता, व उत्तरेस : के.एल.ई. स्कूल, यातील तदंगभुत वस्तुसह २. वर कलम १ मध्ये नमुद केलेला प्लॉट श्रीमती. शशिकला लक्ष्मीनारायण गादी, श्रीमती वरलक्ष्मी विश्वानाथ तल्ला, श्रीमती वसुंधरा संतोषकुमार राहुल, श्री. योगेश श्रीनिवास गादी, श्रीमती ज्योती श्रीनिवास गादी, कु. श्रेणिक प्रविणकुलार गादी व श्रीमती सावित्री प्रविणकुमार गादी यांचे मालकी वहीवाटीचा आहे. आमचे अशिल सदर मालक यांच्यात सदर प्लॉटच्या खरेदीखताचा व्यवहार करण्याचे तोंडी ठरले असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन इसारा रक्कमही स्विकारलेली आहे. त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची हमी दिली आहे. तथापि सदर मिळकतीबाबत अथवा व्यवहाराबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती कागदपत्रासह आजपासून ४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कळवाव्यात अन्यथा आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे गृहीत धरून सदर प्लॉटच्या खरेदिखताचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसलीही तकार ग्राहय धरली जाणार नाही. याची नोंद यावी. हि जाहीर नोटीस दिली ता. २०.२.२०२३

सही/-
**अशिलातर्फे सुवर्णा बाकळे ॲडव्होकेट**
**ऑफीस : जुना एम्पलॉमेंट चौक,**
**३ जयशिल प्लाझा, सोलापूर.**
**मो.नं.९३७०४२४०५५**

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जाये तो जाये कहा?

| कल्याण |
| --- |
| 680-43-670 |

| मेन बाजार |
| --- |
| 456-5 |

# स्थापत्य २०२३ प्रदर्शनाचे शुक्रवारी उद्घाटन

## ▶▶ बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक ८० स्टॉल

✔ सुराज्य/सोलापूर

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सतर्फे भरविण्यात येणाऱ्या 'स्थापत्य २०२३' या बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.२४) नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर होणार आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता हा उद्घाटन सोहळा होणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष अमोल मेहता यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. याच्या समारोपाला रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची उपस्थिती असणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, आयकॉन स्टीलचे संचालक श्याम दाड तसेच वितरक बालमुकुंद राठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शनाचे हे ११ वे वर्ष असून 'लाईव्ह ग्रीन, सेव्ह ग्रीन' ही यंदाच्या प्रदर्शनाची संकल्पना आहे. जलपुनर्भरण, सौरऊर्जा, वापरलेले पाणी शुद्ध करून ते झाडांसाठी वापरण्याचे तंत्रज्ञान, देशीगाईच्या शेणापासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक वस्तू याबाबत यातून जागृती करण्यात येत आहे.

स्थापत्य २०२३ प्रदर्शनामध्ये एकूण ८० स्टॉल लावण्यात येत आहेत. यात इंजिनीयर, तंत्रज्ञ, बिल्डर्स, विकासक, व्यावसायिक, सिमेंट, स्टील, प्लंबिंग, सॅनिटरी मटेरियल, दरवाजे, खिडक्या, रुफिंग मटेरियल, टाईल्स, पडदे, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स मटेरियल आदी विषयांच्या स्टॉलचा समावेश आहे, असे अध्यक्ष अमोल मेहता म्हणाले. स्थापत्य प्रदर्शनाचा समारोप रविवार, २६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता होणार असून या कार्यक्रमास रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि आयकॉन स्टीलचे संचालक दिनेश राठी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.स्थापत्य २०२३ प्रदर्शन शुक्रवार २४ ते रविवार २६ फेब्रुवारीपर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री १० पर्यंत नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर हे प्रदर्शन पाहण्यास सोलापूरकरांसाठी उपलब्ध आहे. नागरिकांनी स्थापत्य २०२३ ला आवर्जुन भेट द्यावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.या पत्रकार परिषदेस प्रदर्शनाचे प्रायोजक आयकॉन स्टीलचे वितरक बालमुकुंद राठी, संघटनेचे उपाध्यक्ष प्रशांत मोरे, सचिव भगवान जाधव, खजिनदार सिद्धाराम कोरे, सहसचिव चंद्रमोहन बत्तुल, सहखजिनदार मनोज महिंद्रकर सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

# शहर-जिल्ह्यातील नऊ हजार अंगणवाडी, सेविका, मदतनीस बेमुदत संपावर

## जिल्हा परिषदेसमोर काळे झेंडे फडकवत केले आंदोलन

सुराज्य/सोलापूर

**विविध प्रलंबित मागण्यांसाठी प्रशासनाला पूर्व सूचना देत सोलापूर शहर-जिल्ह्यातील नऊ हजार अंगणवाडी सेविका मदतनीस सोमवार (दि. २०) पासून बेमुदत संप सुरू केला आहे. मंद्रुप व कुंभारी येथील पर्यवेक्षकांकडून होणारा मानसिक छळ, दमदाटीच्या विरोधात जिल्हा परिषद समोर काळे झेंडे फडकवत निषेध आंदोलन केले.**

जिल्ह्यातील अनेक अंगणवाड्यांना दोन दिवसांपूर्वी अचानक खिंचडीसाठी तांदूळ, पोषण आहाराचा कोरडा शिधा पाठवत त्वरीत वाटपाची सक्ती सेविकांना केली आहे. संप मोडित काढण्यासाठी प्रशासनाकडून दमदाटीचा प्रकार सुरु असून त्याविरोधातही आंदोलन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सुर्यमणी गायकवाड म्हणाले, 'संप मोडीत काढणे, महिला कर्मचाऱ्यांवर दबाव निर्माण करण्यासाठी सार्वजनिक सुट्टीच्या तोंडावर प्रशासनाने पोषण आहार पाठविला आहे. नियमानुसार पोषण आहार एक ते दहा तारखेच्या दरम्यान पाठवणे अपेक्षित आहे.'

पर्यवेक्षकांकडून महिला कर्मचाऱ्यांना दमदाटी दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी, मंद्रुप येथील पर्यवेक्षकांकडून अंगणवाडी सेविकांना दमदाटी करणे, गुन्हे दाखल करण्याची धमकी, अपशब्द बोलतात. पर्यवेक्षकांकडून मानसिक छळ होत असून त्या अरेरावी करणाऱ्या पर्यवेक्षकांची बदली करा अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढण्याचा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष गायकवाड यांनी दिला.

तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या सेविकांना रिक्षातून लाभार्थींना घरोघरी जाऊन आहाराचे वाटप करा, अशी जबरदस्ती, दमदाटीचा निषेध करण्यात आला.



### आकडे बोलतात...

✻ ४२०८ जिल्ह्यातील एकूण अंगणवाड्या. ✻ ४१०० सेविका जिल्ह्यात कार्यरत. ✻ ३२५० मदतनीस जिल्ह्यात कार्यरत. ✻ ५०० अंगणवाडी नागरी प्रकल्पात. ✻१००० सेविका-मदतनीस शहरी प्रकल्पात कार्यरत.

### या प्रमुख मागण्यांसाठी बेमुदत संप –

✻ सेविकांना २० हजार मदतनीसांना १८ हजार रुपये वेतन द्यावे. ✻ शासकीय सेवेत सहभागी करून, सर्व सुविधांचा लाभ द्या. ✻ भविष्यनिर्वाह भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने द्या. ✻ स्थानिक भाषेत भाषेत मोबाईल ॲप उपलब्ध करून द्यावा. ✻ कालबाह्य मोबाइलद्वारे सदोष पोषण ट्रॅकवर ॲपद्वारे माहिती भरण्याची सक्ती नको.

# निराधारांच्या पगारी रखडल्या

सुराज्य/उत्तर सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील निराधारांच्या पगारी गेल्या दोन महिन्यांपासून रखडल्याने हेळसांड होत आहे. त्वरित पगारी जमा कराव्यात, असे निवेदन प्रहार जिल्हा अपंग संघनेच्यावतीने जिल्हा अधिकारी यांना देण्यात आले आहे.

शासकीय कारण, कोटा नसल्याचे सांगत जिल्ह्यातील लाखो संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावण बाळ योजनेतील अपंग, वयस्क महिला पुरुष, दुर्धर आजाराने ग्रस्त, विधवा, विधुर अशांची पगारी गेल्या महिन्यापासून रखडले आहे. त्वरित पगारी जमा कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी दळवी, मस्के, जाधव, गायकवाड यांच्यासह संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# बार्शीतील 'सिंहगड' वेधतोय लक्ष

सुराज्य/बार्शी

**येथील शिवछत्रपती क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संचलित युवा प्रतिष्ठान आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी किल्ले सिंहगड प्रतिकृती देखावा उभारण्यात आला असून हा देखावा पाहण्यासाठी बार्शीकरांनी गर्दी केली आहे.**

शिवजनोमत्सवनिमित्त विविध उपक्रम राबवणाऱ्या युवा प्रतिष्ठानने यावर्षी अष्टभुजा देवीचा देखावा व किल्ले सिंहगड प्रतिकृती देखावा उभारला आहे. हा किल्ला इतका हुबेहूब उभारला आहे की पाहणाऱ्याला खरच सिंहगडावर गेल्याचा अनुभव येत आहे.

किल्ल्याची प्रतिकृती बनविण्याअगोदर युवा प्रतिष्ठानची टीम जो किल्ला बनविण्याचा आहे, त्या किल्ल्याची प्रत्यक्ष जाऊन बारकाईने पाहणी करतात. तेथील गाईड व येत ऐतिहासिक पुस्तकातून त्या किल्ल्याचा इतिहास जाणून घेतात. नंतर किल्ला बनवला जातो. यंदाही शिवजन्मोत्सवासाठी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सदानंद गरड, शिवाजी हाके, कल्याण चव्हाण, शशिकांत डोंगळे, सदानंद धुमाळ, रोहिग डोंगळे, कपिल सरवदे, ज्ञानेश्वर वायकुळे, वैभव ढगे, स्वानंद धुमाळ, मनू चव्हाण, दीपक नवले, अक्षय चव्हाण, आशु डोंबे, ऋषी डोंगळे, मोहित मस्तूद, सुहास वायकुळे, निलेश वायकुळे, अमर गाडे, सोनू नवले यांच्यासह मंडळाच्या सर्व सदस्यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. यंदाही सिंहगड किल्ल्याचे प्रतिकृती पाहण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. शहरवासीयांना याचा लाभ घेता यावा यासाठी आणखी कांही दिवस हा देखावा खुला राहणार आहे. युवा प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबिर व शिवप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात १३० रक्तदात्यांनी रक्तदान करत या उपक्रमात आपला सहभाग नोंदवला.





# कालीचरण ठरला यंदाचा त्रिमूर्ती केसरी

सुराज्य/अकलूज

शंकरनगर येथे झालेल्या त्रिमूर्ती केसरी स्पर्धेमध्ये साडेसहा फूट उंच व शक्तिशाली वैभव मानेसमोर चपळ कालीचरण सोलनकर असा रोमहर्षक खेळ रंगला होता होता. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत चतुराईने कालीचरणने वैभवला झुंजवत ठेवले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या कुस्तीमध्ये कालीचरणने वैभव मानेवर एका गुणाची वरकमाई करुन त्रिमूर्ती केसरीचा बहुमान पटकावला.

महाशिवरात्र यात्रेनिमित्त शंकरनगर-अकलूज येथील शिवतीर्थ आखाड्यात महाशिवरात्र यात्रेनिमित्त कर्मवीर कै. बाबासाहेब माने-पाटील, सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते-पाटील व धर्मवीर कै. सदाशिवराव माने-पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दि. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान सालाबादप्रमाणे त्रिमूर्ती केसरी किताबासाठीच्या कुस्ती स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या.

स्पर्धेचे उद्घाटन सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. एक लाख रुपये रोख व त्रिमूर्ती चषकासाठी सहाव्या फेरीनंतर वैभव माने व कालीचरण सोनकर हे एकमेकांसमोर आले होते. यावेळी



कालीचरण सतत वैभवचा पट काढण्याचा प्रयत्न करत होता. परंतु वैभवने त्याला दाद दिली नाही. वेळेत कुस्ती न झाल्याने पंचांच्या निर्णयानुसार गुणावर कुस्ती लावली. त्यावेळी वैभवने पहिला डाव टाकत ६ गुण मिळवत आघाडी घेतली.परंतु ही आघाडी त्याला जास्त वेळ टिकवून ठेवता आली नाही. कालीचरणने प्रतिडाव टाकत वैभववर कब्जा घेत ६ गुण मिळविले.त्यानंतर वैभवने पुन्हा दोन गुण घेतले. पण कालीचरणने परत कब्जा घेत गुणांची बरोबरी केली. त्यानंतर परत दोघांनी दोन दोन गुण घेतले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील यांचे हास्ते कालीचरणला त्रिमूर्ती केसरी किताब तर वैभव मानेस उपविजेता किताब देवुन गौरवण्यात आले. या प्रसंगी धैर्यशील मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, संग्रामसिंह मोहिते-पाटील, राजेंद्र चौगुले, पोपटराव भोसले, वसंत जाधव, अभयसिंह माने-देशमुख, सहकार महर्षी कारखान्याचे संचालक, प्रताप क्रीडा मंडळ सदस्य, यात्रा कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

**वजन गटातील कुस्ती स्पर्धेत विजेते पुढीलप्रमाणे मल्ल विजयी झाले -**

२५ किलो संग्राम जाधव (रुई), २८ किलो- आदित्य सावंत (इंदापूर), ३० किलो- सुजल गोर (खुडूस), ३२ किलो-हर्षवर्धन पवार (वुड्स), ३५ किलो- राजवीर मोरे (अकलूज), ४० किलो प्रणव हिमने (शिरवाडे), ४५ किलो- यशराज मोरे (अकलूज), ५० किलो- विवेक सातपुते (म्हसवड), ५५ किलो- विशाल सुरवसे (खुडूस), ६० किलो- विशाल रूपनवर (म्हसवड), ६५ किलो- विकी कडे (नातेपुते), ७० किलो- किरण राणे (नातेपुते), ७५ किलो- संदेश शिपकुले (फलटण), ४० किलो किरण माने (जेऊर), ८५ किलो- अविनाश गावडे (सराटी)

# आगामी सर्व निवडणुका रासपा ताकदीनिशी लढवणार : लेंगरे

सुराज्य/पिलीव

माढा मतदारसंघ, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपंचायतीच्या निवडणुका राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर पूर्ण ताकदीनिशी लढवणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी कॅबिनेटमंत्री आ. महादेव जानकर यांनी जाहीर केले आहे. यासाठी त्यांचा संपूर्ण महाराष्ट्राचा धावता दौरा सुरू असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय संघटक बाळकृष्ण लेंगरे यांनी सांगितले. ते माढा लोकसभा मतदासंघाचा दोन दिवसीय १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय दौऱ्यात पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. युती झाली तर माढा युतीमध्ये राष्ट्रीय समाज पक्षाला जागा सुटेल नाही मिळाला तर आमची स्वबळावर लढण्याची तयारी आहे. यासाठी माढा मतदारसंघात कार्यकर्ते व पदाधिकारी यांची भक्कम टिम तयार करण्याचे काम राष्ट्रीय समाज पक्षाच्यावतीने सुरु आहे. माढा लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघाची



आढावा बैठक घेण्यात आली. सध्या राष्ट्रीय समाज पक्ष सर्वच निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश अध्यक्ष काशिनाथ शेवते, प्रदेश महासचिव माऊली सलगर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ॲड संजय माने, पश्चिम महाराष्ट्र लिगल सेलचे अध्यक्ष ॲड विजय लेंगरे तसेच जिल्हा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, विधानसभा प्रभारी यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# फुलांची मुक्त उधळण करीत शिवजन्मोत्सव साजरा

सुराज्य/अक्कलकोट

**'जय भवानी...! जय शिवराय...!' च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्यावतीने जुना राजवाडासमोरील शामियाना मंडपात मंगलमय वातावरणात व फटाक्यांच्या आतिषबाजी व फुलांची मुक्त उधळण करीत उत्साहात छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली.**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे सुरेशचंद्र सूर्यवंशी, शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्यावतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

सदर प्रतिष्ठापना जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात छत्रपती शिवरायांच्या सिंहारुढ पुतळ्याची प्रतिष्ठापना हिरकणी महिला बहु. संस्थाच्या संस्थापिका अध्यक्षा व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या विश्वस्त अलका जन्मेजयराजे भोसले, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेचे सचिवा अर्पिताराजे भोसले, रूपा महेश इंगळे, मल्लम्मा पसारे, स्मिता कदम, संगिता भोसले, उज्वला भोसले, पल्लवी कदम, पल्लवी नवले, स्वाती निकम, क्रांती वाकडे, कविता वाकडे, छाया पवार, तृप्ती बाबर, प्रमिला देशमुख, राजश्री माने, रूपा पवार, स्वप्ना माने, संगीता राठोड, सुवर्णा घाटगे, लता मोरे, आशा पाटील, अश्विनी निंबाळकर, ज्योती शिंदे, अंजली चव्हाण, कविता भोसले, रुपाली भोसले, संगीता साठे, जयश्री सुरवसे, प्रियांका सोनटक्के, सीमा जाधव, सिध्दी पवार, धनश्री पाटील, शेपाली पाटील, सरोजनी मोरे, सोनाली शिंदे, राजश्री कलशेट्टी, दीपिका शिर्के



यांच्यासह हिरकणी महिला मंडळ, रामकृष्ण हरी वारकरी मंडळ, सत्संग महिला भजनी मंडळ, वीरशैव महिला मंडळ व बहुसंख्याने शहरातील विविध महिला मंडळ भगिनींच्या हस्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. उपस्थित शेकडो महिलांना शिव प्रतिमा भेट देण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाचे संस्थापक जेष्ठ नेते सुरेशचंद्र सुर्यवंशी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हाद जाधव, रासपचे घराच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील बंडगर, संपादक प्रवीण देशमुख, प्रथमेश इंगळे, किशोर सिध्दे, अंकुश चौगुले, सिध्देश्वर मोरे, शिवराज स्वामी, सुधाकर गोंडाळ, अमर शिंदे, अभिनंदन दोशी, अरविंद शिंदे, अरविंद साळुंखे, मोहनराव चव्हाण, रामचंद्र घाडगे, शहर शिवसेना प्रमुख योगेश पवार, मिलिंद साळुंखे व रवी कदम, नरसिंग क्षीरसागर, धनराज शिंदे, सुरेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी शिवजन्मोत्सव अध्यक्ष निखील पाटील, उपाध्यक्ष बालाजी पाटील, सचिव अनिकेत (सन्नी) सोनटक्के, खजिनदार शीतल फुटाणे, कार्याध्यक्ष अतिश पवार, फहीम पिरजादे, मिरवणूक प्रमुख प्रवीण घाडगे, गोटू माने, लेझीम संघ व्यवस्थापक वैभव मोरे, प्रथमेश पवार, समर्थ घाडगे, योगेश पवार, शिवजयंती स्टेज व मिरवणूक ट्रॉली सजावट प्रमुख राहुल मोरे, वैभव कामनूरकर, व्यवस्थापक मनोज निकम, राजाभाऊ नवले, सौरभ मोरे, रोहित खोबरे, सत्कार प्रमुख आकाश शिंदे, प्रशांत कडबगावकर यांच्यासह आदिजन उपस्थित होते.

कार्यक्रमाची सांगता राजगीताने करण्यात आले. प्रा.प्रकाश सुरवसे यांनी सूत्रसंचालन केले.



# मुंढेवाडी ग्रामपंचायतच्यावतीने शंभर टक्के कर भरणाऱ्यांचा सन्मान

सुराज्य/मोहोळ : (ता. मोहोळ) ग्रामपंचायतच्यावतीने गावातील शंभर टक्के कर भरून सहकार्य केलेल्या मिळकतदारांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागात ग्रामपंचायत करवसुली करायची म्हणजे ग्रामसेवकास तारेवरची कसरतच करावी लागते. सहजासहजी ग्रामीण भागातील गावकरी ग्रामपंचायत कार्यालयाकडे फिरकत नाही. जर त्यास जन्म-मृत्यूची नोंद लावायची असेल तर किंवा उतारा पाहिजे असेल तर नाही तर त्याचे काही देणे घेणे नसते मग वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवून ग्रामसेवकास करवसुली करावी लागते. मोहोळ तालुक्यातील मुंढेवाडी गावातील ग्रामसेविका स्नेहल काळे यांनी ग्रामपंचायतची कर भरण्यासाठी नागरिकांना प्रवृत्त करण्यासाठी पूर्ण भरणाऱ्या मिळकतदारांचा सन्मान करण्याचा उपक्रम राबविला. त्यांनी शंभर टक्के कर भरणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला. यासाठी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच सदस्य यांनीही सहकार्य केले. यावेळी उपसरपंच राहुल व्यवहारे, शशिकांत पाटील, ग्रामसेवक स्नेहल काळे अमोल व्यवहारे, बंडू व्यवहारे, सचिन पाटील, नागेश व्यवहारे, संभाजी व्यवहारे, जोतिबा चौगुले, महादेव वाघमारे, दयानंद व्यवहारे, विलास व्यवहारे, काका पाटील, विजय व्यवहारे, रामचंद्र चटके ग्रामस्थ उपस्थित होते.



# श्रीनाथ विद्यालयाचा निरोप समारंभ

सुराज्य/श्रीपूर : श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, बोरगाव येथे नुकताच इयत्ता १० वीचा शुभचिंतन समारंभ व इयत्ता १२ वीचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर हे उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कुमुदिनी पाटील, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुधीर कपडेकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील, विद्यालयाचे प्राचार्य श्री कांबळे के. टी., उपमुख्याध्यापक भुजबळ एम. एस., पर्यवेक्षक लष्कर आर. टी. , सर्व विद्यार्थी व सेवकवृंद, पालक वर्ग, बोरगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयासाठी दोन लेक्चर स्टँड भेट दिली. शिक्षक श्रीनिवास गज्जम यांनी मनोगतात मार्गदर्शन केले. राजकुमार पाटील व अरुण सुगावकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन पाटील एस. एस. यांनी केले तर उपस्थितांचे आभार मदने सर यांनी मानले.



# पळसेश्वरमध्ये १०वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

सुराज्य/वेळापूर : श्री. पळसेश्वर विद्यालय चव्हाणवाडी-पळसमंडळ येथील इ. १०वीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा व निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाला व्यवस्थापन समितीचे सभापती भानुदास भोसले-पाटील, सदस्य व नुतन सरपंच हनुमंत शिंदे, सदस्य सुरेश चव्हाण, मुख्याध्यापिका नफिसा आतार उपस्थित होते. १० वीचे वर्गशिक्षक प्रकाश नवगिरे व इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. इ.१० च्या विद्यार्थ्यांनी सर्व मान्यवरांचा सत्कार श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. नुतन सरपंच हनुमंत शिंदे यांनी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. परीक्षेत ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी श्रुती चव्हाण, अंकिता दडस, नम्रता पवार यांनी भावनिक स्वरूपात मनोगते व्यक्त केली. सर्वांचे डोळे पाणावले. अनेक आठवणींना उजाळा देण्यात आला. त्याचबरोबर सुरेश चव्हाण, नफिसा आतार, पंकज पानसरे, मोहन गोरे, रमाकांत साठे, लिपिक संजय फडतरे, इ. १० वी चे वर्ग शिक्षक, प्रकाश नवगिरे यांनी देखील मनोगत व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. इ .१० वी च्या विद्यार्थ्यांकडून प्रशालेस क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, छ. शिवाजी महाराज, राजमाता अहिल्याबाई होळकर, राजर्षी शाहू महाराज या प्रतिमा भेट देण्यात आल्या. सूत्रसंचालन श्रुती चव्हाण, सायली मेटकरी हिने केले.

# 'खेलो इंडिया' श्रीनाथ स्केटिंग क्लबचे सामन्यांमध्ये यश

सुराज्य/पंढरपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या 'खेलो इंडिया' या क्रिडा प्रकारांमध्ये तिसऱ्या खेलो इंडिया हिवाळी सामन्यांचे आयोजन काश्मीरमधील गुलमर्ग येथे करण्यात आले होते. वजा १० अंश सेल्सिअस तापमानामध्ये झालेल्या आईस हॉकी या क्रिडा प्रकारात तुंगत येथील श्रीनाथ स्केटिंग क्लासेसचे सुहर्ष शर्मा व श्रेया क्षीरसागर या दोन विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.




मुलांच्या सतरा वर्षीय संघामधून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत सुहर्ष शर्मा याला कांस्यपदक तर श्रेया क्षीरसागर हिने मुलींच्या खुल्या गटातून महाराष्ट्राच्या संघाने सिल्वर मेडल संपादित केले आहे. याकरिता श्रीनाथ स्केटिंग क्लासेसचे मुख्य शिक्षक संतोष शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे सरपंच डॉ. अमृता रणदिवे, उपसरपंच प्रकाश रणदिवे, ग्रा. पं. सदस्य डॉ. पंकज लामकाने, राजू भोसले, ग्रामस्थ व आदींनी अभिनंदन केले आहे.



## सभागृहाचा समाजाला चांगला उपयोग होईल : आ.बबनराव शिंदे

**टेंभुर्णी** : बृहनमठ वेळापूर शाखा टेंभुर्णी सभागृहाचा समाजाला चांगला उपयोग होईल या सभागृहासाठी १३ लाख रुपयांचा निधी दिला होता परंतु समाजाने एकत्र येऊन चांगल्या पद्धतीने काम करून घेतले आहे. जनतेच्याच पैशाचा विनियोग झाल्यास मनास समाधान मिळते आजपर्यंत टेंभुर्णी मध्ये १६ विविध सभामंडप दिले आहेत तर तालुक्यात ४०० सभामंडप दिले, असे प्रतिपादन लोकार्पण सोहळ्याच्या वेळी आमदार बबनराव शिंदे यांनी केले. यावेळी वेळापूर मठाचे श्रीगुरु शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामी, उत्तराधिकारी शिवराज शर्मा महास्वामी, जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी तुकाराम उर्फ बंडू ढवळे, शिवाजीराव पाटील, भाजपचे तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख मधुकर देशमुख, राष्ट्रवादीचे विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष रमेश पाटील, सरपंच प्रमोद कुटे, उपसरपंच धनंजय गोंदील, विजयकुमार मिरगे, बाळासाहेब धाईंजे, महिंद्र वाकसे, अँड संतोष कानडे, गिरीश ताबे, बाळासाहेब बोराटे, अनिल तोडकर, पंचाक्षरी होदाडे ,रमेशकथले ,राजाभाऊ तोडकर ,वैभव तळे ,पपेश पाटील दीपक व्यवहारे , संदीप मोकाशी, महारुद्र टोंगळे सर, भास्कर सोनवणे , शेखर ताबे, गजानन ताबे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी टिळक रोड येथील पांडुरंग कानडे, महादेव स्वामी, बाळासाहेब भोज, गणेश भोज, गणेश स्वामी, रेवन क्षीरसागर, सतीश होदाडे, संजय होदाडे, बालाजी गवळी, औदुंबर कथले, प्रसाद कथले, अक्षय स्वामी, राजदीप कानडे, साहिल ताबे, शुभम शिवपूजे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र मुळे व श्रीकांत लोंढे यांनी केले.

## कुर्डूवाडीच्या ओम शांती विद्यालयात महाशिवरात्री उत्साहात

**कुर्डूवाडी** : शांतीचा मार्ग दाखवणारे ब्रह्मकुमारी संस्था समाजाला आज नैतिक मूल्याची धारणा करणे करवत आहे. मानवाला शांतीची गरज असल्याचे महादेव टेकडी चिंचगाव येथील शिवचरणानंद सरस्वती महाराज यांनी भावना व्यक्त केल्या. कुर्डूवाडी येथे ब्रह्माकुमारीच विद्यालययांच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. त्रिमूर्ती परमपिता शिव परमात्मा यांचा दिव्य जन्मोत्सव त्याप्रसंगी माजी आमदार विनायकराव पाटील, समाजसेवक भारत देशमुख पडसाळी, सूर्यकांत डेकोळे, दत्तात्रेय चव्हाण, म, तलाठी पुनम साळवी, मीरा नागटिळ, ब्रह्माकुमारी शिवरात्री दीदी ब्रह्माकुमारी गोदावरी दीदी, सेवा केंद्र संचालिका कुर्डूवाडी ब्रह्माकुमारी अनिता दीदी, ब्रह्मा कुमारी अश्विनी दीदी व अन्य ईश्वरीय परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्याने ओलांडला दीड कोटी टन ऊस गाळपाचा टप्पा

## जिल्हा उताऱ्यात मागे आणि गाळपात पुढे

**सुराज्य/शिवाजी हळणवर**

**जिल्ह्यात चालू गळीत हंगामात साखर कारखान्यांनी दीड कोटी टन ऊस गाळपाचा टप्पा ओलांडला असून १० फेब्रुवारीअखेर एक कोटी ५६ लाख २८ हजार ८८ मेट्रिक टन उसाचे गाळप झाले असून सरासरी ८.८७ टक्के साखर उताऱ्याने एक कोटी ३८ लाख ६५ हजार ४१६ क्विंटल साखर उत्पादन केले आहे.**

जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यात ६६ लाख ६२ हजार ८५ टन उसाचे गाळप झाले असून ६० लाख ७० हजार ९१६ क्विंटल साखर ९.११ टक्के साखर उताऱ्याने तयार झाली आहे. तर खाजगी साखर कारखाने ऊस गाळप व साखर उत्पादनात आघाडीवर आहेत.या कारखान्यांनी ८९ लाख ६६ हजार टन उसाचे गाळप करून ७७ लाख ९४ हजार ५०० क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. खाजगी कारखान्यांचा सरासरी साखर उतारा मात्र कमी म्हणजे ८.६९ टक्के आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कारखान्यांचा गाळप हंगाम ऑक्टोबर, नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू झाला. गेल्या चार महिन्यांत खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांनी दिड कोटी टनाचा टप्पा ओलांडला असला तरी अजूनही मोठ्या प्रमाणात ऊस गाळपाविना शेतात उभा आहे. याचे कारण म्हणजे कारखान्यांनी क्षेत्राबाहेरील उसाला दिलेले प्राधान्य हेच सांगता येईल. शेतात उभा असलेला ऊस आता कळीचा मुद्दा बनत चालला आहे.

शेतात उभा असलेला ऊस गाळपासाठी कारखान्याकडे घालविण्यासाठी शेतकरी जिवाचे रान करीत आहे. बऱ्याचशा कारखान्यांचा गाळप हंगाम संपत चालल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच उसाला तोडणी येण्यासाठी शेतकऱ्यांची सुरू असलेली पळापळ पाहून त्याची आर्थिक लूट सुरू आहे. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटापासून ऊसतोडणी करण्यासाठी शेतकऱ्यांकडून चढ्या दराची मागणी करण्यात येत आहे. यामध्ये कारखान्याच्या चिटबॉयला विशेष महत्त्व प्राप्त होत आहे. ऊसतोडीसाठी फडात टोळी पाठविण्यासाठी पैशांची मागणी करण्यात येत आहे.

ऊसतोडीसाठी एकरी ७ ते १० हजार रुपयांची मागणी करण्यात येत आहे. ट्रॅक्टर आणि ट्रॅकचालकही प्रत्येक खेपेला ५०० ते १००० रुपयांची मागणी करतात. उन्हात ची तिव्रता जसजसी वाढत आहे, तसतसा तोडणी कामगार ऊसतोडीसाठी मनाला वाट्टेल ते दर सांगतात. एकीकडे शेतात उभा असलेला ऊस आणि तोडीसाठी मागण्यात येणाऱ्या अवास्तव पैशांमुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.



### जिल्हा एकच, पण साखर उताऱ्यात फरक...

जिल्ह्यातील काही कारखान्यांचा सरासरी साखर उतारा अत्यंत कमी असल्याचे दिसून येत आहे. एकाच जिल्ह्यात घेतल्या जाणाऱ्या उसाच्या उत्पादनातून विविध कारखान्यांच्या साखर उताऱ्यात किमान दोन टक्क्यांची तफावत दिसत आहे.अर्थात, काही कारखाने थेट उसाच्या रसापासून अथवा बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉलनिर्मिती करत आहेत. त्यामुळे त्यांचा साखर उतारा कमी दिसत आहे. त्यांचा अंतिम साखर उतारा निश्चित झाल्यावर त्यामध्ये किमान दीड टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. मात्र, सर्वच कारखाने इथेनॉलनिर्मिती करत नाहीत. अशा साखर कारखान्यांचा साखर उतारा तुलनेने फारच कमी दिसत आहे.अंतिम साखर उताऱ्यावरच एफआरपी निश्चित होत असल्याने साखर उतारा तपासण्यासाठी राज्य शासनाने यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. तरच कारखान्यांकडून शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबेल.

## आठवडा बाजारात मोबाईल चोऱ्या वाढल्या

**सुराज्य/सांगोला**

शहरातील रविवारच्या आठवडा बाजारातून मोबाईलच्या मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत आहेत. आजपर्यंत झालेल्या मोबाईल चोऱ्यांचा तपास ही लागलेला नाही वाढत्या मोबाईल चोरी मुळे जनता हैराण झाली आहे.

सांगोला शहरांमध्ये रविवारचा आठवडा बाजार असतो या आठवडा बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात भाजीपाला खरेदीसाठी शहरासह ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात लोक येत असतात .या गर्दीचा फायदा घेऊन बाजारातून फिरणारी लहान मुले व अनेक महिला पुरुष हे भाजीपाला घेण्यासाठी गर्दी करतात भाजी घेण्यासाठी आलेले ग्राहक यांच्यासमोर पिशवी लावून त्यांच्या खिशातील मोबाईल अलगदपणे काढतात अशा प्रकारे मोबाईल चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक रविवारच्या बाजारातून मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले आहे. गेल्या दोन महिन्यापासून रविवारच्या आठवडा बाजारातून शंभरहून अधिक मोबाईल चोरीस गेले आहेत काहींनी तक्रार दाखल केली त्याचाही तपास लागला नाही तर काहीजण पोलीस स्टेशन कडे तक्रार करीत नाहीत प्रत्येक रविवारच्या आठवडा बाजारात मोबाईल चोर सक्रिय असतात या मोबाईल चोरावर कारवाई करून मोबाईल चोरीचा तपास लावावा. ग्रामीण भागामध्ये ही महूद जवळा घेरडी या गावात ही आठवडा बाजार मोठ्या प्रमाणात भरतो या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात मोबाईलची चोरी झालेली आहे चोरी झालेल्या मोबाईलचा तपास लागावा अशी मागणी तालुक्यातील जनतेमधून केली जात आहे.



> आठवडा बाजारातून चोरी झालेल्या मोबाईलचा तपास लवकरच लावला जाईल. चोऱ्याचा तपास लावण्यासाठी आमची यंत्रणा काम करत आहे लवकरच तपास लागतील.
>
> - अनंत कुलकर्णी
> पोलीस निरीक्षक सांगोला

## वीरशैव मंडळाची २५ फेब्रुवारीला बैठक

**सोलापूर** : महाराष्ट्र राज्य विरशैव शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी शिक्षक कल्याणकारी मंडळाची २४ फेब्रुवारी रोजी शासकीय विश्रामगृह सातरस्ता येथे एक वाजता आयोजित केली आहे.

या सभेत आजीव सभासद आढावा घेणे कायक्कवे कैलास सन्मान पुरस्कार कार्यक्रम घेणे अक्कमहादेवी आदर्श माता पुरस्कार घेणे आदी विषयांवर चर्चा करणे व जिल्हा परिषद सभाग्रहात अक्षयतृतीया दिवसी बसवजयती साजरा केला जावा असे ठराव घेणे. तरी बहूसंखेनी उपस्थित राहावे असे अवाहान अध्यक्ष शिवानंद भरले सचीन बसवराज दिडोरे यांनी एका पत्रकान्वये केले आहे.

## सक्तीची करवसुली थांबवा, अन्यथा टाळे लावू : भोसले

**उत्तर सोलापूर** : पंचायत समिती उत्तराच्या वतीने करवसुली केली जात आहे. करपट्टी भरा असे ग्रामसेवक, सरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, उत्तर तालुका प्रशासन मधील अधिकारी सांगत आहेत. सक्तीची वसुली थांबवा अन्यथा ग्रामस्थांच्या हितासाठी वसुलीच्या विरोधात तीव्र आंदोलने करू, असे भाजप जिल्हा उपाध्यक्ष गणेश भोसले, शिवसेना उप जिल्हा प्रमुख शिवाजी निळ यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

उत्तर प्रशासनाच्या वतीने कर वसुली साठी मोहीम उघडली आहे. अपुरा पानी पुरवठा, खराब रस्ते, वेळी अवेळी ये जा करणारी विज,आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने पुरविल्या जात असताना कर पट्टी भरणा कशी करायची पूर्णपणे सुविधा उपलब्ध करून द्या, त्यांनतर वसुली करा, त्यावेळेस स्वतः हुन कर भरू असा इशारा ग्रामपंचायत प्रशासनाला दिला आहे. सक्तीची होणारी वसुली, अधिकारी अन् पदाधिकारी यांची अरेरावी थांबवण्यात यावी अन्यथा जबरी वसुली विरोधात तीव्र आंदोलने करण्यात येईल असे निवेदनात म्हटले असून यावेळी अनिल गायकवाड, प्रशांत चव्हाण, सुनील चव्हाण, अभिषेक जाधव, विनोद कसबे, तानाजी पवार यांच्यासह ग्रामस्थ उपसथित होते.

## मंगळवेढ्यात आजपासून गैबीसाहेब ऊरूस

**मंगळवेढा** : सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा येथील हजरत पीर गैब-वो-मर्दाने गैब(रह.) उर्स शरिफ २०२३ म्हणजेच धार्मिक तसेच राष्ट्रीय एकात्मकेचे प्रतिक असलेल्या गैबीसाहेबांच्या ऊरूसास मंगळवार दि.२१ फेब्रुवारीपासून प्रारंभ होता असून यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती गैबीपीर ऊरूस कमिटीचे सरपंच प्रशांत गायकवाड यांनी दिली.

गैबीसाहेबांचा ऊरूस हिंदू-मुस्लिम सर्वजण एकत्र येवून गुण्या गोविंदाने पार पाडतात हे या ऊरूसाचे वैशिष्ठ असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील भाविक यावेळी सामील होतात. भाविक वर्ग नारळ-लिंबाचे तोरण गैबीसाहेबांच्या कळसास अर्पण करतात. ऊरूसादिवशी नारळाच्या तोरणाची मोठया प्रमाणात विक्री होते. मंगळवारी २१ फेब्रुवारीला सकाळी १०.०० वा. प्रवेशद्वाराचे उद्‌घाटन रतनचंद शहा सहकारी बँकेचे चेअरमन राहुल शहा यांचे हस्ते व्हा.चेअरमन रामचंद्र जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होत असून सायंकाळी कळसाची भव्य मिरवणूक व देवाचा गंध होईल. सदरचा ऊरूस शांततामय वातावरणात पार पाडणेसाठी समस्त गैबीपीर ऊरूस कमिटीचे कार्यकारी मंडळ, सदस्य, मंगळवेढेकर प्रयत्नशील आहेत.

सुराज्य Classified

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

# विविध उपक्रमांनी छत्रपती शिवरायांना अभिवादन

### पंचायत समिती बार्शी

**बार्शी** : पंचायत समिती बार्शी व जि.प. कर्मचारी, मराठा महासंघ बार्शी यांच्या संयुक्त विद्यमानाने पहिल्यांदाच पंचायत समिती बार्शी या ठिकाणी मोठ्या उत्साहामध्ये शिवजंयती सोहळा साजरा करण्यात आली.

प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीचे पुजन व दिपप्रजोलन बार्शी तालुक्याचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. आदर्श माता म्हणून रंजना लहू नलवडे रा.हळदुगे यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करणेत आला. तसेच पत्रकारीता या क्षेत्रामध्ये विशेष उल्लेखनीय कामकाज केले म्हणून शहाजी फुरडे, नाना गव्हाणे, गणेश गोडसे, सचिन अपसिंगकर, संजय बारबोले यांचा गौरव करणयात आला. तसेच कार्यक्रमास उपस्थित असलेले पत्रकार सुर्यवंशी व धैर्यशिल पाटील यांचाही सत्कार करणेत आला. या कार्यक्रमास नगराध्यक्ष असिफ तांबोळी, रमेश पाटील, अविनाश मांजरे तसेच तालुक्यातील बांधकाम विभागाचे उपअभियंता गौंडरे, ल.पा.चे उपअभियंता सोनवणे, पाणी पुरवठाचे उपअभियंता वाघमारे, गटशिक्षणाधिकारी तांबे, महिला व बालविकास प्रकल्पाच्या अधिकारी श्रीमती. पठाण, पशुधन विकास अधिकारी डॉ.कोळेकर सहाय्यक प्रशासन अधिकारी आडसुळ तात्या, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सूर्यकांत मोहिते, कराड इ.उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार विष्णू पाटील यांनी मांडले. कार्यक्रमाची प्रस्तावना लोकरे यांनी केली. सदर कार्यक्रम यशस्वी करणेसाठी शैलेश सदाफुले, नितीन पाटील, आर. सी.लोखंडे, चंद्रकांत जगताप, प्रमोद यादव, दिलीप भोसले, रमांकात उकिरडे, विजयसिंह सिसोदे, सतिश देशमाने, अमोल धाकपाडे, अनिल गुंड, कुंडलीक खुर्द, सुमित कांबळे, आकाश बडवे, रणजीत गव्हाणे, राजकुमार रंगदाळ, डॉ. काशीद, बाळासाहेब झालटे, रविकिरण कदम, बाबासाहेब मानेरेड्डी, प्रशांत लंगोटे, संतोष मोरे, महेश गिराम, बापु बागुल, मधु आगलावे, आबा धावणे इत्यादीनी परिश्रम घेतले.



### सांगोला नगरपरिषदेतर्फे ३९३ वृक्षांची लागवड


**सांगोला** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९३ व्या जयंतीचे औचित्य साधून शहरात विविध ठिकाणी ३९३ देशी वृक्षांची लागवड करून सांगोला नगरपरिषद मार्फत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी वृक्ष लागवड मा.तहसीलदार तथा प्रशासक श्री.अभिजीत पाटील व मुख्याधिकारी श्री.सुधीर गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अभियांता तुकाराम माने व नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाची टीम यांनी विशेष मेहनत घेतली. ही वृक्ष लागवड मोहीम तहसीलदार तथा प्रशासक अभिजीत पाटील, मुख्याधिकारी सुधीर गवळी, पाणीपुरवठा अभियंता तुकाराम माने, कार्यालय अधीक्षक विजयकुमार कन्हेरे, सहायक मालमत्ता पर्यवेक्षक स्वप्निल हाके, सीएलटीसी स्थापत्य अभियंता अमित कोरे, स्वच्छता निरीक्षक विनोद सर्वगोड, सहाय्यक प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे व पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडली.

### मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शालेय साहित्य वाटप

**अक्कलकोट** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त आझाद गल्ली अक्कलकोट येथे मॉर्निंग ग्रुपच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.मॉर्निंग ग्रुपचे आधारस्तंभ शिवशरण इचगे यांच्या मार्गदर्शनाखाली आजचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी ग्रामसेवक अभिमन्यू ताड यांनी प्रस्तावना केली. सुनील राठोड व जय पारखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. करण चव्हाण,शिंपी, या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे गीत सादर केले.कार्यक्रम अतिशय खेळीमेळीने पार पडला.

### नगरपरिषद प्रमिलाराजे गर्लस्कूल

**अकलूज** : येथील न.प. प्रमिलाराजे गर्लस्कूल या शाळेत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माता पालक गटाचे लीडर माता संगीता माशाळकर यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक शंकरलिंग खजुरगीकर यांनी शिवाजी महाराजांबद्दल माहिती सांगितली. इयत्ता चौथी मधील शेखर मलवे हा विद्यार्थी शिवाजी महाराजांची वेशभूषा परिधान केले होते. शिवजयंती निमित्त शाळेत निपुण भारत अंतर्गत इयत्ता पहिली ते तिसरीच्या माता पालकांची कार्यशाळा संपन्न झाली. माता पालक गटातील रेश्मा साठे, जयश्री माशाळकर, पुनम बनसोडे, यल्लूबाई हलसंगी, रेणूका माने आणि इतरही माता पालकांचे रमेश कोटगी यांनी उपस्थित असलेल्या सर्व मातांचे आभार मानले. शिवजयंती निमित्त सर्व मुलांना खाऊ वाटप करून कार्यशाळेची सांगता झाली.



### श्रीपुर येथे अभिवादन !

**श्रीपूर** : श्रीपुर तालुका माळशिरस येथे छत्रपती शिवाजी महाराजांना शिवजयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सकाळी भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील आणि श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे पूजन करण्यात आले.

यावेळी शिवजन्मोत्सव कार्यक्रमाला महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील, ज्येष्ठ नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, अशोकराव चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक राहुल रेडे पाटील, नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, नगरसेवक प्रकाश नवगिरे, नगरसेवक निनाद पटवर्धन, भाजपा माजी पंचायत समिती सदस्य अनिलदादा जाधव, रावसाहेब सावंत पाटील, विक्रम लाटे, शिवाजी रेडे पाटील, डॉ. संजय लाटे, जालिंदर लोखंडे, नामदेव पाटील, मौला पठाण, माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण तोडकर, ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टिलरीज चे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, महावीर शहा, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, माजी तालुका अध्यक्ष नरेंद्र भोसले, शामराव भोसले, रमेश देवकर, चंद्रशेखर विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग बनसोडे, पांडुरंगचे अधिकारी आर बी पाटील, रतनसिंह रजपूत, संदीप घाडगे अल्लाबक्ष शेख, राजकुमार रेडे पाटील, धनाजी जमदाडे उपस्थित होते.

### कोळेगांव येथे विविध उपक्रम

**पिलीव** : हिंदवी स्वराज्य संस्थापक बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजीराजे भोसले महाराज यांची ३९३ जयंती कोळेगांव (ता माळशिरस) येथे उत्साहात साजरी करण्यात आली. स्वराज्य ग्रुप सटवाई मळा येथे ध्वज कट्टा उभारून त्यावर भगवा ध्वज येथील शालेय विद्यार्थ्यांनींच्या हस्ते फडकवण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये लहान गटात प्रथम क्रमांक मृण्मयी कुमार सावंत, द्वितीय ईश्वरी तानाजी गेजगे, तृतीय क्रमांक दिव्या भारत धोत्रे यांनी मिळवला तर मोठ्या गटात प्रथम क्रमांक अनुराधा अंकुश दुपडे,द्वितीय शिवप्रिय सचिन सावंत तर तृतीय क्रमांक अपर्णा महादेव पारसे यांना मिळाला. स्पर्धाचे बक्षीस वितरण मराठा सेवा संघाचे तालुका कार्याध्यक्ष निनाद पाटील,पत्रकार नितीन मगर, जयराम घाडगे, माजी उपसरपंच आदीकराव सावंत, धनंजय दुपडे, सुभाष सावंत, प्रवीण कदम पाटील, समाधान सावंत, संभाजी दुपडे, नामदेव सावंत, प्रवीण सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धकांना लक्ष करिअर अॅकॅडमी वेळापूर चे धनराज सावंत यांच्या वतीने ट्रॉफी देण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वराज्य ग्रुप चे अध्यक्ष विशाल सावंत,उपाध्यक्ष विराज सावंत,कार्याध्यक्ष अमर सावंत,सचिव प्रवीण सावंत ,शुभम सावंत,अजय सावंत,व सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन श्रीधर सावंत, भीमराव सावंत यांनी केले.

### रिपाइं आठवले गट

**वेळापूर** : वेळापुर (ता.माळशिरस) येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले संपर्क कार्यालय येथे बहुजन प्रतिपालक रयतेचे राजे गोरगरीब कष्टकरी शेतकऱ्यांचे कैवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यमान सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, माजी जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, धानोरे माजी सरपंच जिवन जानकर, वेळापुर पोलिस स्टेशन चे ए एस आय एस आर निकम, पो हे कॉन्स्टेबल एस बी देशमुख, पो हे कॉ दीपक मेहरकर, रा,सा,न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. धनंजय साठे, ग्रा प सदस्य हनुमंत वायदंडे, दिलिप बनसोडे, मदनसिंह माने दे, विजय बनसोडे, भैयासाहेब बाबर, चंद्रकांत पोळ, खंडू आडत, विनायक माने, आयोजक आरपीआय आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, शहराध्यक्ष शरद साबळे, गणेश साठे, समाधान जानकर, नाभिक संघटनेचे अध्यक्ष राहुल सराटे, बाबासाहेब कांबळे, विठ्ठल माने, महेश देवकते, खंडेराव वाघ, दिपक आयरे, तानाजी जाधव, भाऊ अहिरे, अमित धाईंजे, आमन शेख, कमलाकर धाईंजे, ओंकार सरतापे, विराज वायदंडे इत्यादी उपस्थित होते.

### मुंडफणे वस्ती महाळुंग

**श्रीपूर** : मुंडफणे वस्ती महाळुंग येथे महाराज प्रतिष्ठान यांच्यावतीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमांचे पूजन महाळुंग श्रीपुर नगरपंचायतीचे ज्येष्ठ नगरसेवक नानासाहेब मुंडफणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महादेव मुंडफणे, किसन मुंडफणे, अनिकेत मुंडफणे, प्रशांत मुंडफणे, संजय मुंडफणे, सचिन सुरवसे, तानाजी भोसले ,आमीर वसान, गणपत मुंडफणे, नारायण मुंडफणे, शशांक मुंडफणे, संदीप घोंगाणे, रोहित मुंडफणे, सज्जन भोसले, राजू मुंडफणे, आदी. यावेळी उपस्थित होते.

### वेळापुर ग्रामपंचायत

**वेळापूर** : वेळापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे समस्त रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर ग्रामपंचायतचे नूतन सरपंच रजनीश बनसोडे यांनी पूजन करून अभिवादन केले. यावेळी माजी. जि प सदस्य बाळासाहेब धा इंजे, वेळापूर उपसरपंच तानाजी चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर धनंजय साठे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, दीपकआबा राऊत, अमृतराव माने देशमुख, शिवाजी पनासे, दीपक चव्हाण, रविराज गायकवाड, हनुमंत वायदंडे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, माजी सरपंच जीवन जानकर, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, भैया बाबर, विजयभाऊ बनसोडे, संजय माने, प्रदीप सरवदे, राहुल सराटे, दीपक माने देशमुख, मदन माने देशमुख, विनायक माने, दिलीप बनसोडे, बाबासाहेब कांबळे, भाऊ आयरे, अजय बनसोडे, माजिद मुलाणी, महिला जिल्हा उपाध्यक्षा सौ अश्विनी उमेश भानवसे, सौ पारुबाई आठत, तसेच कर्मचारी धनाजी धांडोरे, बापू घोरपडे ,सुभाष माने, महेश देवकते, नागेश नाईकनवरे, सुरेश जाधव, सुरज जाधव आदी. यावेळी उपस्थित होते.

# ५६ आमदारांना व्हीप बजावण्याची मुख्यमंत्री शिंदे यांची तयारी

सुराज्य/मुंबई

केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला शिवसेनेचं नाव आणि पक्षचिन्ह देण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता शिंदे गटाकडून आक्रमक पावलं उचलली जात आहेत. शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांनी आज विधीमंडळात पक्षाच्या आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीत आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाबाबत चर्चा झाली.

तसंच अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात येणाऱ्या चहापानाला उपस्थित राहण्याबाबत पक्षाच्या सर्व ५६ आमदारांना उपस्थित राहण्यासाठी व्हिप बजावण्याचा निर्णय झाला, अशी माहिती बैठकीनंतर आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. शिंदे गटाच्या या खेळीमुळे आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत असलेल्या १६ आमदारांची मोठी राजकीय कोंडी होणार आहे.

'निवडणूक आयोगाने आम्हाला अधिकृत पक्षाची मान्यता दिली आहे. त्यामुळे आमच्या पक्षाचे प्रतोद भरत गोगावले यांनी बजावलेला व्हिप शिवसेनेच्या सर्व ५६ आमदारांना बंधनकारक असणार आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दृष्टीने बजावण्यात येणाऱ्या व्हिपचं पालन न करणाऱ्या आमदारांवर कारवाई होऊ शकते,' असं शिवसेना विधीमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर आमदार संजय शिरसाट यांनी स्पष्ट केलं आहे.




### ...तर ठाकरे गटाला दिलासा मिळणार

निवडणूक आयोगाच्या निर्णयाला ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. न्यायालयाने आयोगाच्या निर्णयाला स्थगिती दिली तर ठाकरे गटाला दिलासा मिळू शकतो. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाच्या निर्णयावर कोणतीही भूमिका घेतली नाही तर मात्र ठाकरे गटाची मोठी अडचण होणार आहे.

महाराष्ट्र विधानसभेत सध्या ठाकरे गटाचे १६, तर विधान परिषदेत १२ आमदार आहेत. लोकसभेत उद्धव ठाकरे गटाचे ६, तर राज्यसभेत ३ खासदार आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर ठाकरे समर्थक आमदार-खासदारांना शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा पक्षादेश पाळणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे आता व्हिप बजावल्यानंतर हे लोकप्रतिनिधी नेमकी काय भूमिका घेतात, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## धनुष्यबाणासाठी ठाकरेंची सुप्रीम कोर्टात धाव

# तातडीच्या सुनावणीस नकार; पवार ठाकरेंच्या संपर्कात

सुराज्य/मुंबई

**केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देत त्यांना धनुष्यबाण हे पक्षचिन्ह बहाल केले होते. याविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ठाकरे गटाकडून सोमवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. यामध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आजच सुनावणी होऊन निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती मिळावी, यासाठी ठाकरे गट प्रयत्नशील होता.**

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने आज ठाकरे गटाची याचिका दाखल करुन घेण्यास नकार दिला. त्यामुळे ठाकरेंच्या गोटातील अस्वस्थता वाढली आहे. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यात फोनवरून चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यात केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालासंदर्भात चर्चा झाली. शरद पवार आणि ठाकरे यांनी कायदेशीर बाबींवर चर्चा केली. यावेळी शरद पवार यांनी महाविकास आघाडी तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभी असल्याचे सांगत उद्धव ठाकरे यांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला. उद्धव ठाकरे यांनी नुकतीच सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाची बाजू मांडणाऱ्या वकिलांशी चर्चा केली होती. या चर्चेतील कायदेशीर बाबी शरद पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून जाणून घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे आता आगामी काळात ठाकरे गट काय भूमिका घेणार, हे पाहावे लागेल. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी शिवसेना भवनात सर्व जिल्हाप्रमुखांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत उद्धव ठाकरे जिल्हाप्रमुखांना काय आदेश देणार, हे पाहावे लागेल. तसेच उद्धव ठाकरे आज पत्रकार परिषद घेण्याची शक्यता आहे.




### नाव गेलं, चिन्ह गेलं आता कार्यालयावरही मुख्यमंत्र्यांचा ताबा; ठाकरेंना पुन्हा धक्का!

शिवसेना पक्षाचं नाव आणि धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांना निवडणूक आयोगानं दिलं आहे. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह मिळाल्यानंतर शिंदे गट अधिकच आक्रमक झाला आहे. शिंदे गटाच्या आमदारांनी विधिमंडळात दाखल होत शिवसेनेच्या पक्ष कार्यालयावर ताबा घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज की जय... जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा दिल्या गेल्या.

ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयासंदर्भात सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या याचिकेत शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत झालेला निर्णय योग्य नसल्याचे म्हटले आहे. शिवसेना कार्यकारिणीत पक्षाच्या अध्यक्षाला सर्वोच्च अधिकार आहेत. शिवसेनेच्या घटनेनुसारच ही कार्यकारिणी अस्तित्वात आली आहे. फक्त आमदार आणि खासदारांच्या संख्याबळाच्या आधारे पक्ष कोणाकडे सोपवायचा हा निर्णय योग्य नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली आहे.

शिंदे गटाकडून सोमवारी विधिमंडळातील शिवसेनेच्या पक्ष कार्यालयाचा ताबा घेतला होता. यानंतर मुंबई महानगरपालिकेतील शिवसेनेचे कार्यालयही ताब्यात घेण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडून सुरु आहे. मात्र, शिवसेनेचे पक्षकार्यालय बंद ठेवण्यात आले आहे.

यावरुन शिवसेना आणि ठाकरे गटात संघर्ष होण्याची शक्यता आहे. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिवसेनेकडून (शिंदे गट) पक्षाच्या सर्व ५६ आमदारांना व्हीप बजावण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. विधानसभेत ठाकरे गटाचे १५, तर विधान परिषदेत १२ आमदार आहेत. लोकसभेत ठाकरे गटाचे ६, तर राज्यसभेत ३ खासदार आहेत. या सर्वांना शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा पक्षादेश पाळणे बंधनकारक असेल. तसे झाल्यास आदित्य ठाकरे यांच्यासह १४ आमदारांची कोंडी होऊ शकते.

# केंद्रीय निवडणूक आयोग बरखास्त करा; उद्धव ठाकरे

सुराज्य/मुंबई

निवडणूक आयोग बरखास्त करा. निवडणूक आयुक्तांची नियुक्ती लोकशाही मार्गाने करायला हवी, अशी मागणी सोमवारी उद्धव ठाकरे यांनी केली.

ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षांची बैठक शिवसेना भवनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, न्यायाधीशांच्या निवडीसाठी कॉलेजियम आहे. या कॉलेजियवर कायदा मंत्री किरन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. मात्र सरन्यायाधीश कॉलॉजियम पद्धतीवर ठाम राहिले. त्यामुळे केंद्र सरकारला माघार घ्यावी लागली. त्याप्रमाणेच निवडणूक आयुक्तांची नियुक्ती लोकशाही मार्गाने व्हायला हवी.



शिवसेना नाव व चिन्हाचा निकाल देणाऱ्या निवडणूक आयुक्तांची लोकशाही मार्गाने निवड झालेली नाही. त्यांची नियुक्ती झालेली आहे. जर सर्वच संविधानिक पदांची निवड केली जाते. मग निवडणूक आयुक्तांची निवड का केली जात नाही. न्यायाधीशांच्या निवडीसाठी कॉलेजियम आहे. मग निवडणूक आयुक्तांच्या निवडीसाठीही प्रक्रिया हवी आहे. प्रशांत भूषण यांनी निवडणूक आयुक्त्यांच्या नियुक्तीविरोधात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की निवडणूक आयोगचं बरखास्त करावा. मनामानी कारभारासाठी निवडणूक आयोग बरखास्त करु नये. तर नव्याने निवडणूक आयुक्तांची निवड करावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

आमच्या गटाच्या आमदारांना व्हीप लागू होत नाही. निवडणूक आयोगाने मुळ चिन्ह आणि नाव गोठवून आम्हाला पर्यायी नाव आणि चिन्हं दिलं होत. याचा अर्थ निवडणूक आयोगाने दोन गट मान्य केले आहेत. तसेच आम्ही निवडणूक आयोगाच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. असे असताना आमच्या आमदारांना त्यांचा व्हीप लागू होणार नाही, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.

निवडणूक आयोगाकडे नाव आणि चिन्हाचा वाद होता. आयोगाकडे पक्ष निधीचा वाद नव्हता. त्यामुळे आयोगाने पक्ष निधीचा मुद्दा उपस्थित केला तर त्यांच्यावर कायदेशीर दावा दाखल होऊ शकतो. निवडणूक आयोग काही सुलतान नाही पक्ष निधीचे आदेश द्यायला, अशी टीकाही उद्धव ठाकरे यांनी केली.

आम्ही मागणी केली होती की सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर निवडणूक आयोगाने निकाल द्यावा. तरीही निवडणूक आयोगाने निकाल दिला. कशासाठी घाई केली. महत्त्वाचे म्हणजे हे सर्व आमदार एकत्र गेले नाहीत.


आधी १६ मग २४ असे आमदार गेले. त्यामुळे त्यांना कोणत्या तरी पक्षात विलिन होणे आवश्यक होते. त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरु आहे. न्यायालयाचा निकाल येण्याआधीच निवडणूक आयोगाने निकाल दिला. गुंतागुंत वाढवण्यासाठी हा निकाल आयोगाने दिला, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

# छगन भुजबळांचा २०१९च्या निवडणुकीबाबत मोठा गौप्यस्फोट

इस्लामाबाद/नाशिक

महाविकास आघाडीद्वारे सत्ता स्थापन करण्याचे निश्चित झाले तेव्हा उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी एकनाथ शिंदे, सुभाष देसाई यांची नावे पुढे केली होती. परंतु, काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधील ज्या नेत्यांना मंत्रीपद मिळणार होते, ती ज्येष्ठ मंडळी होती. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनीच मुख्यमंत्री व्हावे, अशी अट त्यांना घालण्यात आली,' असे वक्तव्य माजी मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकमध्ये केले.

भुजबळ फार्म येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केल्यानंतर भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीचे तळवे चाटले,' असा घणाघात पुणे दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. त्यावर बोलताना भुजबळ म्हणाले, शहा हे विरोधक असल्याने आरोप करणारच; परंतु महाविकास आघाडीचे सरकार स्थापण्यापूर्वी सर्वांनी एकत्र बसून निर्णय घेतला होता. मुख्यमंत्रीपदासाठी ठाकरे यांनी एकनाथ शिंदे, सुभाष देसाई अशी काही नावे पुढे केली होती; परंतु, काँग्रेस आणि राष्ट्रवादीमधील ज्येष्ठ आमदारांनाच मंत्रीपद दिले जाणार होते. त्यामुळे ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारावे, अशी गळ त्यांना घालण्यात आली. शरद पवार यांनीही ठाकरे यांना तसा आग्रह केला.'



शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला मिळाले आहे. त्यावर संजय राऊत यांनी दोन हजार कोटींचे डील' झाल्याचा गंभीर आरोप केल्याकडे भुजबळ यांचे लक्ष वेधण्यात आले. ते म्हणाले, मला यावर फार बोलता येणार नाही; परंतु शिवसेनेतून एकनाथ शिंदे आणि काही लोक बाहेर पडले, या घटनेची स्क्रिप्ट' दिल्लीमध्ये तयार झाली. अशा प्रकारचे व्यवस्थापन कौशल्य त्यांच्याकडे असून, या घटना घडवून आणल्या आहेत.'

खरी शिवसेना कोणती हे जनताच ठरवू शकते; परंतु यासाठी निवडणुका होणे आवश्यक असल्याचे भुजबळ म्हणाले. सोशल मीडियामुळे कोणतेही पक्षचिन्ह सगळीकडे पोहचविणे शक्य आहे; परंतु संघटनेचा प्रमुख कोण, हेच लोक लक्षात घेतात. काँग्रेस पक्ष फुटला. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँगेस उदयाला आली, तेव्हा सोशल मीडिया नव्हती. तरीही पक्षचिन्ह लोकांपर्यंत पोहोचले. कोणाला ठेवायचे आणि कोणाला नेस्तनाबूत करायचे हे जनताच ठरवेल,' असेही भुजबळ म्हणाले.

# ७० व्या वर्षी पोलीस अधिकाऱ्याला लाच घेतल्याची शिक्षा



सुराज्य/मुंबई

कोल्हापूर येथील निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक रघुनाथ ज्ञानदेव काटकर यांना लाच घेतल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने सहा महिन्यांची शिक्षा व पाच हजार रुपयांचा दंड ठोठवला आहे. काटकर यांचे वय ७० वर्षे आहे. सन २००६ मध्ये काटकर यांना लाच घेताना अटक झाली होती. सुमारे १७ वर्षांनी उच्च न्यायालयाने त्यांना दोषी धरले आहे.

त्यामुळे या निकालाला दहा आठवड्यांची स्थगिती द्यावी, अशी मागणी रवीं आनंद पाटील यांनी केली. याला सरकारी वकील एच. जे. देढीया यांनी विरोध केला. न्यायालयाने या निकालाला दहा आठवड्यांची स्थगिती दिली. दंडाच्या रक्कमेला स्थगिती देण्यात आलेली नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

कोल्हापूर विशेष सत्र न्यायालयाने १३ जुलै २०१६ रोजी काटकर यांना निर्दोष सोडल्याचा निकाल दिला. या निकालाविरोधात राज्य शासनाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्या. मोडक यांच्यासमोर यावर या याचिकेवर सुनावणी झाली. तक्रारदारांनी २००६ मध्ये त्यावेळचे सीआयडीचे उप अधिक्षक चौगुले व सहाय्यक पोलीस निरीक्षक काटकर यांच्याविरोधात लाच मागितल्याची तक्रार केली होती. तक्रारदार यांच्याविरोधात भुदरगड नागरी सहकारी पतसंस्थेतील घोटाळ्याचा गुन्हा होता. त्यांना अटक झाली व नंतर जामीनावर सुटका झाली. त्यानंतर याचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला. तक्रारदारांचे दागिने न्यायालयाच्या ताब्यात होते. ते परवत मिळवण्यासाठी तक्रादारांनी न्यायालयात अर्ज केला होता. त्यासंदर्भात सहकार्य मिळावे यासाठी तक्रारदार चौगुले यांच्याकडे गेले. त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक काटकर यांची भेट घेण्यास त्यांना सांगितले. सहाय्यक निरीक्षक काटकर यांच्याद्वारे तक्रारदार यांच्याकडे २० हजार रुपयांची लाच मागण्यात आली. त्यास तक्रारदारांनी नकार दिला. दागिने परत मिळवण्यासाठी त्यांनी केलेला अर्जही स्थानिक न्यायलयने फेटाळला.

ऑक्टोबर २००६ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याची तक्रार करण्यात आली. ही तक्रार नेमकी कोणत्या तारखेला करण्यात आली यावरुन मतभेद होता. त्यानंतर सापळा रचून सहाय्यक पोलीस निरीक्षक काटकर यांना अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विशेष न्यायालयाने तक्रारदार यांचा दावा फेटळून लावला. तक्रारदारांविरोधातच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार समोर आलेला नाही. तो का समोर आला नाही याचा खुलासा सरकारी पक्षाने केलेला नाही. तसेच उप अधिक्षक चौगुले यांच्याविरोधातही तक्रार होती. मात्र सहाय्यक पोलीस निरीक्षक काटकर यांच्याविरोधातच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, असा ठपका स्थानिक न्यायालयाने ठेवला व काटकर यांची निर्दोष सुटका केली.

# भारताशी चर्चा करण्याचा माजी सैन्य अधिकाऱ्याचा पाकला सल्ला

इस्लामाबाद/वृत्तसंस्था

आर्थिक गर्तेत सापडलेल्या पाकिस्तानची गुर्मी आता उतरली आहे. भारताबरोबर चर्चा करण्यासाठी आता केवळ गयावया करणेच बाकी होते. पाकिस्तानच्या एका माजी उच्चपदस्थ लष्करी अधिकाऱ्याने पाकिस्तानने भारताशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

चौदाव्या कराची लिटरेचर फेस्टिव्हलच्या समारोपाच्या दिवशी मेजर जनरल (निवृत्त) अतहर अब्बास हे सहभागी झाले होते. इंटर सर्व्हिस पब्लिक रिलेशन्सचे (खड्झठ) माजी महासंचालक अतहर अब्बास म्हणाले की, आजच्या घडीला पाकिस्तानच्या दृष्टीने चर्चा करणे, ही गरज आहे. चर्चा पुढे नेणे, हे केवळ सरकार किंवा लष्कराचे काम नाही. कारण सर्व जबाबदारी त्यांच्यावर टाकली तर, स्थिती बदलणार नाही, असे सांगून ते म्हणाले, प्रसारमाध्यमे, व्यवसाय, व्यापार या माध्यमातून याची सुरुवात करता येईल. त्यामुळे भारतीय समाजात चर्चेसाठी पुरक असे वातावरण निर्माण होईल. परिणामी सरकारवर चर्चेसाठी दबाव निर्माण होईल. तसेच अमेरिका आणि युरोपियन युनियनचाही बाह्य दबाव निर्माण करता येईल.

भारत आणि पाकिस्तानमध्ये चर्चा सुरू करण्याच्या यापूर्वी अनेक संधी आल्या होत्या; पण त्या सर्व गमावल्या. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे बसने लाहोरला आल्याचा आणि त्यानंतर पाकिस्तानचे माजी हुकूमशाह परवेझ मुशर्रफ आग्र्याला गेल्याचा उल्लेख त्यांनी केला. पाकिस्तानातील राजकीयदृष्ट्या अस्थिर परिस्थितीबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. जेव्हा तुम्ही आपापसात भांडत असाल तर, अशा वातावरणात चर्चा होऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले.

पाकिस्तानातील अस्थिरता भारतासाठीही हानिकारक आहे. अशा स्थितीत केवळ सरकारनेच भारताशी चर्चा करण्याची वाट आपण करू शकत नाही, असेही त्यांनी सांगितले.

# जयराम रमेश यांचे मोदी सरकारला सवाल

नवी दिल्ली/वृत्तसंस्था

अदाणी समूहाच्या गौतम अदाणी यांचे मोठे भाऊ विनोद अदानी यांची अदाणी समूहाच्या दुष्कृत्यां'मध्ये मध्यवर्ती भूमिका' होती, असा आरोप काँग्रेसने केला आहे. विविध तपास यंत्रणांचा राजकीय पक्ष, माध्यमे आणि दबावापुढे न झुकणाऱ्या व्यावसायिकांविरोधात मुक्तपणे वापर केला जातो, त्याच तपास यंत्रणा विनोद अदाणींची चौकशी करणार की नाही, असा प्रश्न पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी विचारला आहे.



विनोद अदाणी हे अदाणींच्या एका कंपनीतून दुसऱ्या कंपनीमध्ये अब्जावधी डॉलर कर्ज पाठवण्याचे काम करत असत, या व्यवहारांची सेबी आणि ईडीतर्फे चौकशी का नाही, असा प्रश्न काँग्रेसने विचारला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनच्या घुसखोरीप्रमाणेच याही मुद्द्यावर मौन साधले आहे, म्हणून आम्ही प्रश्न विचारायचे थांबणार नाही, असे ट्वीट जयराम रमेश यांनी केले आहे.

काँग्रेसतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारण्यात येणाऱ्या हम अदानी के है कौन' या प्रश्नमालिकेचा भाग म्हणून जयराम रमेश यांनी ट्वीट करून प्रश्न विचारले आहेत. विनोद अदाणी हे अदानी समूहाच्या कोणत्याही सूचिबद्ध कंपनीत व्यवस्थापक म्हणून काम करत नाहीत, अशी माहिती अदाणींतर्फे देण्यात आली होती. मात्र ही माहिती चुकीची असल्याचा आरोप रमेश यांनी केला आहे. जयराम रमेश यांनी दावा केला आहे की, अदाणी समूहाच्या या दाव्यानंतरही या समूहाने वारंवार पब्लिक फाइलिंगमध्ये ही माहिती दिली की, विनोद अदाणी या समूहाचा अभिन्न भाग आहेत. २०२०मध्ये बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल एका दस्तऐवजातही अशी माहिती दिली गेली आहे. याशिवाय रमेश यांनी प्रश्न केला की, तुमचे (पंतप्रधान) मित्र गुंतवणकदारांना आणि जनतेला अशाप्रकारे उघडपणे खोटं का बोलत आहेत?

# बहीण म्हणून उद्धव ठाकरेंशी काय बोलले हे तुम्हाला कशाला सांगू : पंकजा मुंडे

सुराज्य/पुणे

**केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर दिलेल्या निकालानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. यावर अनेक राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यात आता भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी देखील प्रतिक्रिया देत आपली या प्रकरणावरील भूमिका स्पष्ट केली आहे. चिंचवडच्या भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप यांच्या प्रचारासाठी आल्या असताना सोमवारी पंकजा मुंडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना आपली भूमिका स्पष्ट केली आहे.**

या सगळ्या राजकीय परिस्थितीकडे मी नेहमीच कुतूहलाने पाहिलेल आहे. मी जेव्हा बोलते तेव्हा व्यासपीठ कोणतं त्याच्यावर अवलंबून असतं. माझे प्रत्येकाशी खूप वैयक्तिक आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. पण मला एवढचं म्हणायचे की, आत्ता जो काळ आहे तो काळ सर्वांसाठी कसोशींचा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक कार्यकर्ता पक्षाचा नेतृत्व करू शकतो हे नवीन मेसेज दिला आहे. हा मेसेज यशस्वी करणं आणि त्यांच्यासोबत असणारे सर्व लोक निवडून आणणं, ही कामगिरी करण्याची त्यांच्यासमोर संधी आहे. सत्तेच्या माध्यमातून लोकांची सेवा करण्याची त्यांच्याकडे संधी आहे. असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.



दुसरीकडे, उद्धव ठाकरे यांच्यासमोर शिवसेना पक्षाचे नाव नसताना पक्ष उभा करणे हा मोठा प्रश्न आहे. त्या प्रश्नांचे उत्तर ते शोधतील आणि पुढे जातील, त्यामुळे ठाकरे आणि शिंदे हे दोघेही माझ्यासाठी पुढच्या काळात कुतूहलाचा विषय असणार आहेत. असं देखील पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. दरम्यान, बहीण म्हणून आपण उद्धव ठाकरे यांच्याशी बोलला आहात का? असा प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारला असता त्या म्हणाल्या, जे बहीण म्हणून बोलायचं आहे ते तुमच्यासमोर कशाला सांगू. तर उद्धव ठाकरे यांना सल्ला द्यावे इतकी मी मोठी नाही. मी सगळ्यांची लहान बहीण आहे. असंही त्या म्हणाल्या.

चिंचवड आणि कसब्याची पोटनिवडणूक बिनविरोध व्हायला पाहिजे होती असं मुंडे म्हणाल्या आहेत.

'कोणी निवडणुकीच्या रिंगणात उभे राहायचं किंवा नाही राहायचं हा विषय आता मागे पडला आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी सगळ्यांची इच्छा होती पण आता लोक रिंगणात उतरले आहेत तर लढाई होईल. निकालानंतर स्पष्ट होईलच कुणाचं म्हणणं लोकांच्या मनामध्ये घर करत आहे', असे पंकजा यांनी म्हटले.

४० स्टार प्रचारक भाजपकडे असताना देखील आजारी गिरीश बापट यांना प्रचारात उतरवलं गेले, यावर देखील पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'भाजपकडे जास्त स्टार प्रचारक आहेत त्याला आता आपण काय करणार. बापट साहेब हे सीनियर नेता आहेत. पण त्यांचा आशीर्वाद त्या निवडणुकीसाठी आवश्यक असेल असं पक्षाला वाटलं असेल आणि बापट साहेबांना ते करावसं वाटलं तर त्यात काही हरकत असण्याचे कारण नाही', असे मत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

# महापालिकेचे १ हजार ७५ कोटींचे बजेट सादर

- ५ टक्के करवाढीची होणार अंमलबजावणी
- आवश्यक नागरी सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न : आयुक्त

सुराज्य/सोलापूर

**महानगरपालिकेने सन २०२३-२४ चे कोणतेही करवाढ व दरवाढ न करता मागील वर्षीच्या तुलनेत यंदा विविध कराच्या महसुली उत्पन्नात १९२ कोटींची कपात करून २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता १ हजार ७५ कोटींचे अंदाजपत्रक सादर केले. यापूर्वी मंजूर झालेली भांडवली मूल्यवर्धित पाच टक्के वाढीव कर येत्या एप्रिल महिन्यांपासून लागू होणार असल्याची माहिती आयुक्त शीतल तेली उगले यांनी दिली. हे अंदाजपत्रक प्रभारी मुख्यलेखापाल तथा उपायुक्त विद्या पोळ यांनी आयुक्तांकडे सादर केले. यामध्ये महापालिकेचे अंदाजपत्रक ६७७ कोटींचे आहे तर राज्य आणि विविध केंद्राचा निधी मिळून हे बजेट १ हजार ७५ कोटींचे सादर करण्यात आले आहे.**

दरवर्षी प्रशासन हे स्थायी सभागृहाकडे बजेट सादर करते. यावर स्थायींत निर्णय होऊन महासभेत बजेटला अंतिम मान्यता देण्यात येते. मात्र यंदा सध्या प्रशासकीय राजवट असल्याने २०२३ - २४ चे अंदाजपत्रक हे महापालिकेचे प्रभारी मुख्य लेखापाल तथा उपायुक्त विद्या पोळ यांनी प्रशासक तथा आयुक्त शितल तेली - उगले यांच्याकडे सादर केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत आदी मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता केलेले अंदाजपत्रक हा ७४४ कोटींचे होते. यंदाचे बजेट ६७७ कोटी २७ लाखांचे आहे. यामध्ये प्रामुख्याने कर आकारणी व वसुली विभागातील फुगीर आकड्यांवर नियंत्रण आणण्याचा मुख्यत्वे बदल झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत करतील महसूली उत्पन्न २३५ कोटींवरून ९७ कोटींची कपात करीत १३८ कोटींवर आणले आहे. महापालिका गाळ्यांचा भाडेसंदर्भात शासनाकडून अद्याप निर्णय न झाल्याने भाडे उत्पन्न १५ कोटींने कमी केले आहे. महापालिकेकडे इतर नवे उत्पन्नाचे साधन नसल्याने त्याचाही बोजा १५ लाखांनी कमी केला आहे. पाणीपुरवठ्यातून मिळणारे महसूल २९ कोटींने तर जमा होणारी भांडवली रक्कमही पावणे ९ कोटींने कपात करीत दरवर्षी अंदाजपत्रकातील फुगीर २२२ कोटींच्या आकडा यंदाच्या अंदाजपत्रकात कमी झाला आहे.

महापालिकेच्या जागेवर लावण्यात येणारी होर्डिंग, जागेतून मिळणारे भाडे अशा विक्री आणि भाड्यातून सव्वातीन कोटींचे महसूल वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवून आणि शासनाकडून मिळणाऱ्या महसूली अनुदानात १९ कोटी ५० लाखांची वाढ निश्चित करीत असे किरकोळ २९ कोटींची भर अंदाजपत्रकात घालण्यात आली आहे. आर्थिक बाजू सक्षम करणारे वास्तववादी बजेट मांडले असले तरी अप्रत्यक्षपणे पाच टक्के करवाढीचा बोजा हा नागरिकांवर आहे. नागरिकांना आवश्यक त्या नागरी सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न असल्याचे शेवटी आयुक्त उगले यांनी सांगितले.

### विद्यार्थिनींना सायकल वाटप

सोलापूर महापालिका शाळेतील इयत्ता आठवी ते नववीच्या विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात येणार आहे. दिव्यांग सहाय्य योजनेंतर्गत दिव्यांगांना शासनाच्या सुधारित दरानुसार भत्ता अदा करण्यात येत आहे, असेही महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी यावेळी सांगितले.

### भांडवली कामांमध्ये यांचा आहे समावेश

वार्ड वाईज कामे - ११.३८ कोटी, विविध योजनेसाठी मनपा हिस्सा - २० कोटी, जागा संपादन करणे, जागा ताब्यात घेणे - पाच कोटी, गुंठेवारी १.१० कोटी , डीपी आर तयार करणे - तीन कोटी, स्मार्ट सिटी हिस्सा- तीस कोटी असे एकूण ७०.४८ कोटीची तरतूद यासाठी करण्यात आली आहे.



### महापालिकेची एकूण जमा बाजू अशी

आर्थिक वर्षामध्ये विविध बाबींपासून मिळणारे उत्पन्न कंसात टक्केवारी याप्रमाणे - मनपा करापासून उत्पन्न १३८ कोटी ४३ लाख रुपये कोटी (२०.४४ टक्के), निश्चित महसुली उत्पन्न १३ कोटी ९६ लाख ४२ हजार ( २.०६), महापालिकेचे मालमत्तेपासून भाडे उत्पन्न २१ कोटी ८१ लाख ५० हजार (३.२३), शुल्क आणि वापरकर्ता शुल्क १०१ कोटी ५९ लाख ४५ हजार (१५.००), विक्री आणि भाडे एक कोटी सत्तर लाख रुपये (०.०२५), महसुली अनुदान २९२ कोटी ७ २ लाख ३५ हजार( ४३.२२), गुंतवणुकीतून उत्पन्न एक कोटी (०.१५ ) , दिलेल्या कर्जावरील व्याज एक लाख (०.०१), इतर उत्पन्न ५५ लाख १५ हजार (०.०८), पाणीपुरवठा जमा ८३ कोटी २९ लाख ६० हजार (१२.३०) भांडवली जमा २२ कोटी दहा लाख (३.२६) असे एकूण ६७७ कोटी २७ लाख ४७ हजार रुपये.

### १९२ कोटींची आहे तूट :

सन २०२२ -२३ च्या अंदाजपत्रकात महसुली उत्पन्नाच्या अपेक्षित उत्पन्न प्राप्त झाले नाही. यामुळे १९२ कोटी ९१ लाख २७ हजार रुपये कमी म्हणजेच तूट आहे. महसुली जमामध्ये मान्य अंदाज एकूण ७४४ कोटी ८७ लाख ६३ हजार रुपये अपेक्षित होते मात्र सुधारित अंदाजानुसार एकूण ५५१ कोटी ९६ लाख ३६ हजार रुपये आहे. यामुळे १९२ कोटी रुपयांची तूट दिसून येते. ही तूट भविष्यात सातत्याने कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

**असे आहे चालू अंदाजपत्रक :** सन २०२३ - २४ चे एकूण अंदाजपत्रक १०७५ कोटी १९ लाख ४ हजार ४०१ रुपयाचे सादर करण्यात आले आहे. यामध्ये अ) महसुली विभाग ६५५ कोटी २० लाख ४ हजार ४०१ रुपये, ब) भांडवली विभाग ३९५ कोटी ४२ लाख रुपये तर क) कर्ज विभाग अंतर्गत २४ कोटी ५७ लाख रुपयेचा समावेश आहे.

---

## चार शिवजयंती उत्सव मंडळांवर गुन्हे दाखल

### ध्वनीक्षेपक, जनरेटर आदी साहित्य जप्त



**सोलापूर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रविवारी शहरात भव्य अशी सांगता मिरवणुक निघाली होती.या मिरवणुकीत सामिल होणाऱ्या मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना मिरवणुकी मध्ये त्यांच्या वाद्यांच्या आवाजाची तिव्रता नियमाप्रमाणे ठेवण्याबाबत लेखी सुचना दिलेल्या होत्या.परंतु त्या सूचनाकडे मिरवणुकीतील बहुतांशी मंडळांनी दुर्लक्ष केले.

मिरवणुकी मध्ये ध्वनीक्षेपकाच्या आवाजाच्या मर्यादिचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या चार शिवजयंती उत्सव मंडळांवर फौजदार चावडी पोलीस ठाणे व जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन, मिरवणुकीमध्ये वापरण्यात आलेले वाहने, ध्वनीक्षेपक, जनरेटर इत्यादी साहित्य जप्त करण्यात आलेले आहेत.हि कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहा.पो.आयुक्त संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली फौजदार चावडी पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील व जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडील राजेंद्र करणकोट तसेच त्यांचे पोलीस स्टाफ यांनी केलेली आहे.

## विवाहितेची विष पिऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

करजगी (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या लक्ष्मी यल्लप्पा यारोळे (वय ३४) या विवाहितेने विष पिऊन आत्महत्या केली.

६ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास तिने राहत्या घरात अज्ञात कारणावरून विष प्राशन केली होती. तिला खाजगी रुग्णालयात उपचार करून यल्लप्पा (पती) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. ती सोमवारी पहाटे मयत झाली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## 'वालचंद'च्या कर्मचाऱ्यांचे गांधीगिरी पद्धतीने आंदोलन

**सोलापूर :** वालचंद शिक्षण समूहातील बेमुदत संपात सहभागी नसलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन गांधीगिरी पद्धतीने महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले. मंगळवारी शहरातील सर्व महाविद्यालयातील कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी नऊ ते दुपारी दोन या वेळात निदर्शने आंदोलन करणार आहेत.

विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संप सोमवारपासून सुरु झाला. विद्यापीठासह सोलापूर शहर व जिल्ह्यातील ३७ महाविद्यालयातील ७५० शिक्षकेतर कर्मचारी या संपात सहभागी आहेत. बेमुदत संपाच्या पहिल्या दिवशी वालचंद शिक्षण समूहातील महाविद्यालयाच्या गेटसमोर शहरातील अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासनाच्या विरोधात निदर्शने व घोषणा देऊन आंदोलन सुरू केले.



आंदोलनस्थळी ठाकरे सेनेचे विष्णू कारमपुरी, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, कस्तुरबाई कॉलेज एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.आश्विन बोंदार्डे यांनी भेट देऊन या संपास शुभेच्छा देऊन पाठिंबा व्यक्त केला. यावेळी दोन्ही प्राचार्यांचेही बुके व गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. बेमुदत संपाच्या पहिल्या दिवशी शहरातील संगमेश्वर, दयानंद, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला, युनियन महिला, वसुंधरा, सोलापूर सोशल, ए. आर. बुर्ला व छत्रपती शिवाजी रात्र या शहरातील अनुदानित महाविद्यालयातील ३०० कर्मचारी वालचंद शिक्षण समूहातील महाविद्यालयाच्या गेट समोर उपस्थित होते. राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष राजेंद्र गोटे, विभागीय सचिव अजितकुमार संगवे, कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, खजिनदार राहुल कराडे, सहसचिव इमाम लालका, दिपाली करजगीकर, आरती देशक, संजीवनी सादुल, नियाझ शेख, कय्युम पठाण, अल्ताफ होटगी यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने व घोषणा देऊन आंदोलन केले.

**दयानंदमध्ये पायरीवर क्लास**

दयानंद महाविद्यालयातील वर्ग खोल्या उघडले नसल्यामुळे विधी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी त्याचा प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा वर्ग पायरीवर घेतला.

---

## सायकलस्वाराचा मोबाईल हिसकावला

**सोलापूर :** फोनवर बोलत सायकलवर सावकाश जात असताना अनोळखी दोघा इसनी मोटारसायकलवर येऊन पाठीमागे बसलेल्या एका इसमाने तरुणाचा १३ हजार रुपये किमतीचा मोबाईल बळजबरीने हिसका मारून घेऊन गेला आहे.

ही घटना दि.८ जानेवारी रोजी सकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास आदिती फार्मासिटिकल कारखाना सुनील नगर रोड एमआयडीसी सोलापूर येथे घडली. याप्रकरणी गोपीनाथ दत्तात्रय येमुल (वय-३०, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात दोन इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पेटकर हे करीत आहेत.

### थोरला मंगळवेढा तालिमच्यावतीने शिवभोजन

## ११ हजार शिवभक्तांनी लाभ घेत दिली तृप्तीची ढेकर

सुराज्य/सोलापूर

थोरला मंगळवेढा तालमीचे अध्यक्ष अमोल शिंदे यांच्या पुढाकरातून आयोजित शिवभोजनाचा तब्बल अकरा हजार शिवभक्तांनी लाभ घेत तृप्तीची ढेकर दिली. यासाठी एक हजार किलो गहू, आठशे किलो तांदूळ आणि तीनशे किलो रवा लागला. एकच वेळी टेबलवर आठशे शिवभक्तांनी या शिवभोजना स्वाद घेण्याची सोय मंडळाच्या वतीने करण्यात आली होती. हे शिवभोजन यशस्वी करण्यासाठी तब्बल चारशे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी योगदान दिले. शहरात शिव जयंती निमीत्त शहरातील विविध मंडळातर्फे मिरवणूक काढण्यात येते.

या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी सोलापूर शहरासह आपसपासच्या गावातील नागरिक येत असतात. त्यांच्या जेवणाची सोय व्हावी यासाठी थोरला मंगळवेढा तालमीच्यावतीने शिवभोजनाची सोय करण्यात आली होती. पुरी, दोन भाजी, शिरा मसाला भात अशा मेनूचा तब्बल अकरा हजार शिवभक्तांची लाभ घेऊ तृप्तीची ढेकर दिली.

या शिवभोजनासाठी यासाठी एक हजार गव्हू, १ टन मसाले भात, १ टन मैद्याच्या पोळ्या, ५०० किलो शिरा असा स्वयंपाक करण्यात आला होता. इतकंच नव्हे तर एका पंगतीत आठशे शवभक्तांच्या बसण्याची व्यवस्थाही करण्यात आली. ५०० वाढपी आणि ४०० स्वयंपाकी, चारशे मंडळाचे कार्यकर्ते राबत होते.



**मिरवणुकीस येणाऱ्या शिवभक्तांना जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून जवळपास अकरा हजार शिवभक्तांची जेवणाची सोय करण्यात आली. एका पंगतीत ८०० जणांना बसवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मिरवणुकीत सहभागी झालेला शिवभक्त उपाशी जाऊ नये यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.**

**- अमोल शिंदे, थोरला मंगळवेढा तालीम**

## अपघातामधील जखमी दुचाकी चालकाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

होटगी रोडवरीलं साईबाबा मंदिर परिसरात दारूच्या नशेत दुचाकीवरून घसरून गंभीर जखमी झालेला जयसिंग दत्तूसिंग रजपूत (वय ३० रा. हिळळी ता.अक्कलकोट) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी सायंकाळी मयत झाला.

तो १६ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास होडगी रोड परिसरातील साईबाबा मंदिराजवळ दुजाकीवरून घसरून गंभीर जखमी झाला होता. त्याला बेशुध्द अवस्थेत म्बुलन्स मधून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## १०० बेडच्या संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्या भूमिपूजन

**गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची उपस्थिती**



**सोलापूर :** सोलापुरात ५० वर विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी एकत्रित येऊन संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू केले आहे. सध्या पांजरापोळ चौकातील जुने जैन हॉस्पिटल येथे ते कार्यरत आहे. लवकरच एसटी बस डेपो समोरील जीएम चौकातील रिकाम्या जागेत हे हॉस्पिटल सुरू होईल, अशी माहिती हॉस्पिटलचे चेअरमन डॉ श्रीकांत माकम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याचे भूमिपूजन गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांच्या हस्ते तर आमदार संजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली २२ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या हॉस्पिटलमध्ये गॅस्ट्रोचे युनिट उभे राहील. वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टरांकडून होतील. स्त्री रोग कॅन्सर ऑर्थोपेडि क न्यूरोलॉजिस्ट बालरोग जनरल फिजिशियन असे तज्ज्ञ डॉक्टर येथे २४ तास उपलब्ध असतील.

गेल्या दीड वर्षात ३३८ मेजर ऑपरेशन आणि ५००० पेक्षा जास्त ओपीडी आणि इतर सिरीयस ऑपरेशन यशस्वीरित्या करण्यात आले अशी माहिती माकम यांनी दिली. वैद्यकिय शाखेतील आणि तज्ञ डॉक्टरांना एकत्र आणून एकच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस व्हाईस चेअरमन डॉक्टर मेहबूब मुलानी, सचिव दत्ता शिंदे, डॉ. राजू मठ, सचिन पांढरे आदी उपस्थित होते.

---

### वन विभागाची कारवाई

## चंदनासह ३० लाखांचा मुद्देमाल केला जप्त

**सोलापूर :** वन विभागाने मंद्रुप ते कंदलगाव रस्त्यावर चंदनाची अवैध वाहतूक करणाऱ्या विना नंबर प्लेट वाहनाला पकडले. यामध्ये २० लाख रुपये किंमतीचे चंदन होते. चंदन व एक नवीन बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ३० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल वनविभाग जप्त केला असल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी दिपक खलाणे यांनी दिली.

वनविभागाने यावेळी हिराप्पा परशुराम भोसले, परशुराम हुबळी भोसले (रा. दोघे घाडगेवस्ती मु.पो. खर्डी) रमेश चन्नप्पा भोसले (रा. मंगळवार पेठ, परीट गल्ली, मिरज) यांना ताब्यात घेतले. पुढील तपास वनपाल शशिकांत एकनाथ सावंत करीत आहेत. ही कारवाई सोलापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक धैर्यशिल पाटील व सहा. वनसंरक्षक (रोहयो). लक्ष्मण आवारे यांचे मार्गदर्शनाखाली केली वनपरिक्षेत्र अधिकारी दिपक खलाणे, वनपाल शशिकांत सावंत, शंकर कुताटे वनरक्षक तुकाराम म. बादणे, अनिता शिंदे, गंगाधर कणबस, वाहनचालक कृष्णा निरवणे, आनंद भडकवाड व नितीन चराटे यांच्या पथकाने कारवाई केली.

## आजपासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात

**सोलापूर :** २१ फेब्रुवारी ते २१ मार्च दरम्यान शहरातील १९ परीक्षा केंद्रावर बारावीची परीक्षा होत असून, या परीक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलीस आयुक्तालयाने १४ जमाव बंदीचे कलम लागू केले असून,या कलमाचा भंग करणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांनी दिले आहेत. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन,सेल्युलर फोन, फैक्स, ईमेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असणार आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही.

## समांतर जलवाहिनीसाठी मानेंचे उद्या आंदोलन

- निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करणार शक्तीप्रदर्शन

सुराज्य/सोलापूर

**उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी कामासंदर्भात सोलापूर महापालिकेकडून कसलीही कार्यवाही न झाल्यामुळे माजी आमदार दिलीपराव माने हे बुधवार २२ फेब्रुवारी रोजी आंदोलन करणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माने यांचे हे आंदोलन म्हणजे एक मोठे शक्तीप्रदर्शन मानले जात आहे. या आंदोलनासाठी गर्दीचे नियोजन करण्यासाठी त्यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.**



सोलापूर शहर विशेषतः हद्दवाढ भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी स्मार्ट सिटी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या उजनी-सोलापूर जलवाहिनीचे काम तातडीने सुरू करणे संदर्भात माने यांनी ६ फेब्रुवारी रोजी आयुक्तांना भेटून चर्चा केली होती. ८ दिवसात या संदर्भात कार्यवाही न झाल्यास आंदोलन करणार असल्याचे सांगितले. मात्र पालिकेकडून या कामासंदर्भात कसलीही कार्यवाही व अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे ते २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करणार आहे. या आंदोलनाची जोरदार तयारी करण्यात आली असून प्रत्येकाला किती गर्दी जमवायची याचे नियोजनही देण्यात आले आहे. त्यांच्या समर्थकांना गर्दी जमवण्याचे टार्गेट दिले आहे. माने यांनी आगामी विधानसभा निवडणूक दक्षिण मतदारसंघातून लढण्याच्या जाहीर केले आहे. या मतदारसंघात ग्रामीण बरोबर शहरी भागही आहे. आतापर्यंत दिलीप माने यांना ग्रामीण भागातून चांगले मतदान होत होते मात्र शहराच्या भागातून त्यांना कमी मतदान झाल्यामुळे २०१४ मध्ये त्यांचा पराभव झाला होता. आता हीच बाब लक्षात ठेवून त्यांनी आता शहराच्या मुद्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. यापूर्वीही दिलीप माने यांनी नागरिकांच्या समस्यांसाठी महापालिकेसमोर आंदोलन केले होते आता समांतर जलवाहिनीच्या मुद्यावरून दिलीप माने दुसऱ्यांदा महापालिकेच्या प्रश्नावर आंदोलन करत आहेत. हे आंदोलन म्हणजे एक त्यांचे मोठे शक्तिप्रदर्शनच मानले जात आहे. त्यासाठी खुद्द दिलीप माने स्वतः त्यांच्या समर्थकांना फोन करून आंदोलनासाठी उपस्थित राहण्यासाठी सांगत आहेत.

**जिल्हा परिषदेसमोर होणार आंदोलन**

दिलीप माने यांचे आंदोलन महापालिकेसमोर होणार होते. मात्र पोलिस आयुक्तांनी आंदोलनासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन हे आंदोलन माने यांना जि.प. समोर घेण्यात यावे, अशी विनंती केली. माने यांनी ती विनंती मान्य केली. त्यामुळे बुधवारी सकाळी १० वाजता हे आंदोलन जिल्हा परिषदेसमोर होणार आहे.